आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥२॥
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटो तया भूतां ॥४॥
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषांचे ॥५॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥७॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं इये ।
दृष्टादृष्टविजये । होआवे जी ॥८॥
येथ म्हणे श्रीविश्वेशराओ । हा होईल दानपसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥९॥

श्रीज्ञानदेवांचे
पसायदान
(विवरणासह)

ह.भ.प. शंकरमहाराज खंदारकर

Scanned by CamScanner

॥ श्रीदत्तसाधुराज ॥

श्रीज्ञानदेवांचे

पसायदान

(विवरणासह)

ह.भ.प. शंकरमहाराज खंदारकर

वै. शंकरमहाराज खंदारकर विश्वस्त संस्थेचे प्रकाशन
१९९६

Scanned by CamScanner

पसायदानाचा उपक्रम

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥ (अ. १८।१७९३)

अवतरण : श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या संतोषाकरिता व विश्वाच्या कल्याणाकरिता श्रीमद्भगवद्गीतेवर मराठी टीका लिहून देशीकार लेणे चढविले. या टीकेचा श्री नामदेव-एकनाथमहाराजादी संतांनी 'भावार्थदीपिका', 'निगमवल्ली', 'गीतालंकार', 'ज्ञानेश्वरी', 'ब्रह्मानंदलहरी' 'ब्रह्मसाम्राज्यदीपिका', 'ज्ञानदेवी' इत्यादी अनेक अर्थपूर्ण नावांनी गौरव केला आहे. या टीकेला स्वत: श्रीज्ञानेश्वर महाराजांनी 'धर्मसंकीर्तन' असेही एक लाडके नाव दिले आहे.

तसेच श्रीज्ञानेश्वर महाराजांनी श्रीगुरुनिवृत्तिनाथांना 'विशदबोधविदग्ध', 'विद्यारविंदप्रबोध' इत्यादी प्रौढ व गोड विशेषणांनी गौरविले आहे.

पण 'पसायदान' मागण्याच्या संदर्भात श्रीज्ञानराज हे श्रीनिवृत्तिनाथांना 'विश्वात्मक देव' आणि स्वकृत गीताटीकेला 'वाग्यज्ञ' म्हणतात. 'योग्य प्रकरणात योग्य शब्द कसे वापरावेत' ही कविप्रतिभा श्रीज्ञानराजांचे ठिकाणीं अभिजात होती हे तर खरेच, पण 'विश्वात्मक देव' आणि 'वाग्यज्ञ' हे दोन्ही शब्द गीताशास्त्राच्या दृष्टीने अर्थगर्भ व साभिप्राय आहेत. कारण गीतेत असे म्हटले आहे की,

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविता: (३।१२)

'यज्ञाने संतुष्ट झालेले देव आपल्याला हवे ते भोग देतील' हा सिद्धांत ज्ञानदेवांनी पक्का लक्षात ठेवला व याचा ग्रंथसमाप्तीच्यावेळी 'पसायदान' मागण्याच्या कामी उपयोग केला.

श्रीज्ञानदेवांनी गीतेत सांगितलेल्या अनेक यज्ञांपैकी गीताटीकारूप स्वाध्याय हा एक महान 'वाग्यज्ञ' केला आहे आणि 'आचार्यदेवो भव' 'गुरूला देव मानणारा हो' या श्रुतीच्या आज्ञेनुसार श्रीज्ञानदेव हे आपल्या श्रीगुरूला देव मानीत होते. अशा रीतीने 'यज्ञ' आणि 'देव' यांची जोडी सहजच येथे मिळाली आहे. शिवाय

Scanned by CamScanner

श्रीनिवृत्तीनाथ हे सदाशिवाचा अवतार असल्यामुळे महादेव होते. रुद्रसूक्तांत भगवान सदाशिव शंकराला 'विश्वरूप' म्हटले आहे आणि विष्णुसहस्त्रनामात प्रारंभीच भगवान महाविष्णुला 'विश्व' म्हटले आहे. रुद्रसूक्तांत व पुरुषसूक्तांत शिव-विष्णूंच्या विश्वात्मकतेचे वर्णन केले आहे. अशा व्यापक अर्थाने श्रीगुरू निवृत्तीनाथ हे समस्तसुरवर्य हरिहरात्मक 'विश्वात्मक देव' आहेत आणि देव हे यज्ञाने हमखास संतुष्ट होतात. कारण, त्यांना तो प्रिय असतो. हा सर्व शास्त्रार्थ मनात घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या वाग्यज्ञाने श्रीगुरुदेवांनी संतुष्ट व्हावे अशी पहिल्या ओवीत इच्छा व्यक्त केली आहे.

'आता विश्वात्मकें देवें'।

विवरण : आता ग्रंथसमाप्तीनंतर विश्वात्मक श्रीनिवृत्तिदेवांनी या ग्रंथरूपाने झालेल्या वाङ्मय यज्ञाने प्रसन्न व्हावे आणि प्रसन्न होऊन मला हे प्रसादाचे दान द्यावे.

या ओवीत श्रीगुरू निवृत्तिनाथांना 'विश्वात्मक देव' म्हटले आहे. विश्वात्मक याचे चार अर्थ संभवतात.

(१) विश्वं व्याप्नोति-विश्वाला ब्रह्मरूपाने व्यापतो.

(२) विश्वं आदत्ते- विश्वाला ईश्वररूपाने उत्पत्ति-स्थिति-लयांच्या द्वारा स्वीकारतो.

(३) विश्वं अत्ति- विश्वाला जीवरूपाने पंचविषयद्वारा खातो-भोगतो.

(४) विश्वं अतति- विश्वात सत्ता-स्फूर्तिरूपाने सर्वकाळ असतो. म्हणून श्रीगुरुनिवृत्तिदेव विश्वात्मक आहेत. किंवा विश्वं आत्मा यस्य, असा ब्रहुवीही आणि स्वार्थी कप्रत्यय होऊन 'विश्वात्मक' शब्द होऊ शकतो. त्यामुळे विश्व हे ज्याचे स्वरूप आहे, अथवा 'यस्य सर्व आत्मैवाभूत' ही श्रुती ज्ञान्याचा व्यापक अनुभव सांगते. निवृत्तीनाथ हे ज्ञानी असल्यामुळे त्यांना विश्व हे आत्माच झाले होते, तसेच निवृत्तीनाथ हे ब्रह्मरूपाने देव होते. अठराव्या अध्यायाच्या आरंभी 'जय जय देव निर्मळ' इत्यादी ओव्यांत निवृत्तीनाथांना 'देव' म्हटले आहे. ज्या देवाचे वर्णन आद्य, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य, आत्मरूप म्हणून ज्ञानेश्वरीत पहिल्या अध्यायात पहिल्या ओवीतच केले आहे, तो देव आणि निवृत्तीनाथ यांच्यात परमार्थत: ऐक्य आहे. अशा व्यापक अर्थाने श्रीज्ञानेश्वर महाराजांनी निवृत्तीनाथांना 'विश्वात्मक देव' म्हटले आहे.

'विश्वात्मक देव' या शब्दांत आणखी एक असा भाव आहे की, पसायदान

Scanned by CamScanner

देण्याचा 'अधिकार' या शब्दाने सूचित केला आहे. कारण, जो देहात्मक आहे, जो स्वत:ला देहस्वरूप, देहाएवढा परिछिन्न मानतो, अशा कोणत्याही भ्रान्त मनुष्याचे ठिकाणी असे महत्त्वाचे पसायदान देण्याचे सामर्थ्य व ज्ञान असू शकत नाही. जो विश्वात्मक देव आहे, तोच असे दान देऊ शकतो. हा निवृत्तीनाथांचे ठिकाणी असलेला दान देण्याचा 'अधिकार" विश्वात्मकें देवें' या शब्दाने सूचित केला आहे. या शब्दावाचून 'दानशूर' 'उदार' यापैकी कोणत्याही शब्दांनी 'सर्वोच्च दान देण्याचा असामान्य अधिकार' हा अर्थ व्यक्त झाला नसता, म्हणून 'विश्वात्मकें देवें' हाच शब्द असामान्य अधिकाराचे समर्थन करण्यास योग्य आहे.

अवतरण : दान देणाऱ्याचे ठिकाणी दान देण्याचा जसा अधिकार असावा लागतो, तसा दान मागणाऱ्याचे ठिकाणीही असावा लागतो. तो अधिकार श्रीज्ञानेश्वर महाराज आपले ठिकाणी असल्याचे पुढील ओवीत सूचित करतात.

येणें वाग्यज्ञें तोषावें।

श्री गुरुदेवा, आपण माझ्या या गीताटीकारूप वाग्यज्ञाने संतुष्ट व्हावे.

यज् धातूचे संगतीकरण, दान आणि पूजा असे तीन अर्थ आहेत. हे तीनही अर्थ ज्ञानदेवांना अभिप्रेत आहेत. त्यापैकी पहिला 'संगतीकरण' हा अर्थ श्रीज्ञानदेव चवथ्या अध्यायात सांगतात.

एकीं शब्दीं शब्द यजिजे। वाग्यज्ञ म्हणिजे। (ज्ञा. ४।१४२)

वेदाची संथा, शास्त्राचा पाठ किंवा अध्यात्माचा उपदेश करताना श्रीगुरूच्या मुखातून निघालेल्या शब्दांशी शिष्याने आपल्या शब्दांचे सुसंवादीपणाने अथवा अनुवादपणाने संगतीकरण म्हणजे ऐक्य करणे याला 'वाग्यज्ञ' म्हणतात.

असा संगतीकरणस्वरूप 'वाग्यज्ञ' श्रीज्ञानदेवांनी दोन प्रकारांनी केला आहे. पहिला असा की –

श्रीभगवंताच्या गीतारूपी शब्दांशी आपल्या टीकारूपी मराठी शब्दांचे संगतीकरण केले आहे.

दुसरा असा की,

आदिनाथ शंकरापासून गुरूक्रमाने प्राप्त झालेले समाधिधन श्री निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांच्या ग्रंथरूपी पदरात बांधून दिले होते. त्यामुळे गुरूच्या उपदेशाशी ज्ञानदेवांच्या ग्रंथाचे संगतीकरण झाले होते.

अशा रीतीने ज्ञानदेवांनी संगतीकरणस्वरूप 'वाग्यज्ञ' दोन प्रकारांनी केला आहे.

Scanned by CamScanner

दुसरा 'दान' हा अर्थ देखील ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे. अकराव्या अध्यायात ज्ञानदेव म्हणतात –

भरोनि सद्भावाची अंजुळी। मियां ओवियां फुलें मोकळीं।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं विश्वरूपाच्या॥ (११।७०८)

'मी विश्वरूपाच्या चरणयुगुलावर सात्त्विक श्रद्धेची ओंजळ भरून ओव्यारूपी मोकळी फुले समर्पण केली.'

अर्थात ओवीवृत्त असलेला व शब्दांशब्दांत प्रगाढ पांडित्य व मोठा आशय असलेला अमूल्य काव्यग्रंथ आणि तो विश्वरूप-विश्वात्मक देवाला समर्पण करणे यात यज् धातूचा 'दान' हा दुसरा अर्थ अभिप्रेत आहे.

तिसरा 'पूजा' हा अर्थ ज्ञानदेवांनी पंधराव्या अध्यायात स्पष्टच सांगितला आहे.

आतां विश्वात्मकु माझा। स्वामी निवृत्तिराजा।
तो अवधारूं वाक्यपूजा। ज्ञानदेवो म्हणे॥(१५)

या ओवीत ज्ञानेश्वरीग्रंथद्वारा केलेल्या गुरुसेवेला 'वाक्यपूजा' म्हटले आहे.

सारांश, श्रीज्ञानेश्वरमहाराजांना 'वाग्यज्ञ' या एकाच शब्दाने वाक्संगतीकरण, वाग्दान आणि वाक्पूजा हे तीनही अर्थ अभिप्रेत आहेत.

एखाद्या विद्वान, पंडित, कवी यांना ग्रंथस्वरूप वाग्यज्ञच करावयाचा असेल तर, तो वरील तीन अर्थांनी युक्त असावा, म्हणजे तो खरा सार्थ होतो. नसता अनर्थालाच कारण होतो.

ज्ञानदेवांचा 'वाग्यज्ञ' असा व्यापक अर्थाचा होता, त्यामुळे एवढा मोठा विश्वकल्याणार्थ 'वाग्यज्ञ' करणाऱ्या याज्ञिकाला आपल्या इष्टदेवतेला पसायदानाची प्रार्थना करण्याचा पूरेपूर अधिकार आहेच.

हरिभक्त वा गुरुभक्तांचे ठिकाणी महत्त्वाचे दान मागण्याकरिता तितकाच महत्त्वाचा अधिकार असावा लागतो. त्यावाचून हरी वा गुरू प्रसन्न होऊन 'वर' देत नाहीत.

पण ज्यांनी गुरूपासून अध्ययन करून त्यांच्या शब्दाशी आपले शब्द संगत-एकरूप केले आहेत.

ज्यांनी आपला ग्रंथ गुरुदक्षिणा म्हणून विश्वरूप देवाला समर्पण केला आहे.

ज्यांनी ग्रंथद्वारा गुरूची वाक्पूजा केली आहे.

ज्यांनी आपला ग्रंथ गुरुकृपेचे वैभव मानून कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ज्यांनी प्रत्येक अध्यायांत गुरुमहिमा आणि गुरूसेवा वर्णिली आहे.

Scanned by CamScanner

ज्यांनी स्वत:ला 'निवृत्तिदास आणि निवृत्तीनाथसुत' असे म्हणवून विनयपूर्ण शिष्यभाव व्यक्त केला आहे. त्या ज्ञानदेवांनी महान वाग्यज्ञ केला व आपला दान मागण्याचा संपूर्ण अधिकार सिद्ध करून 'येणें वाग्यज्ञें तोषावे' अशी प्रार्थना केली आहे.

अवतरण : एका वेगळ्या दृष्टीने ज्ञानदेवांचा हा 'वाग्यज्ञ' सकामच होता. कारण, त्यांनी दानाची प्रार्थना केली आहे ती अशी -

तोषोनि मज द्यावें। पसायदान हें।

विश्वात्मक श्री गुरुदेवांनी माझ्या या वाग्यज्ञाने संतुष्ट, तृप्त, प्रसन्न होऊन मला हे पसायदान द्यावे.

श्रीज्ञानदेवांचा हा वाग्यज्ञ सकाम होता, हे जरी खरे असले तरी, त्यांनी स्वत:करिता **'पुत्रान् देहि धनं देहि'** असे क्षुद्र पदार्थ काहीही मागितले नाहीत. जे मागितले ते विश्वाच्या कल्याणाकरिता मागितले आहे. यातच त्यांच्या मनाचें औदार्य व अवताराचे विभूतिमत्त्व प्रकट झाले आहे.

Scanned by CamScanner

पहिली प्रार्थना

जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें॥(अ. १८ ओ. १७९४)

अवतरण : या पसायदानात '**जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात।** आणि '**किंबहुना सर्वसुखीं**' या दोन ओव्यांतून ज्याला ज्याची इच्छा असेल त्याला ते प्राप्त होवो आणि सर्वांनी सर्व सुखांनी पूर्ण व्हावे अशी प्रार्थना केली आहे. पण यावर अशी शंका येते की, एखाद्या दुष्टाला साधूंना पीडा देण्याचीच इच्छा असते व पीडा देण्यातच त्याला सुख वाटते. चोराला परधनाची इच्छा असते व त्यातच त्याला सुख वाटते. तसेच स्त्रीलंपटाला परस्त्रीची इच्छा असते व तिच्या अंगस्पर्शातच त्याला सुख वाटते. पण ही त्याची इच्छा पूर्ण व्हावी आणि त्यांना तसे सुख प्राप्त व्हावे की काय ? या शंकेच्या निरसनार्थ ही पहिली प्रार्थना आहे.

'जे खळांची व्यंकटी सांडो'।

खळाचा कुटिलपणा-वाकडेपणा जावो. दुष्टाचा दुष्टपणा जावो. जे खळ क्रोध या विकाराने दूषित होऊन सज्जनांना पीडा देतात, जे लोभ या विकाराने परधन मिळविण्याकरिता कुटिल उद्योग करतात, जे कामविकाराने परस्त्रीची इच्छा करतात, त्यांना सत्कर्माचा सरळ मार्ग सोडून वाकडा मार्ग स्वीकारण्यात सुख वाटते. पण ते सुख परिणामी विषासारखे असते हे त्यांना कळत नाही.

खळ हा स्वत:चा स्वार्थ नसताना दुसऱ्याच्या उत्कर्षात विषाद व अपकर्षात हर्ष मानीत असतो, वेद व संत यांच्या प्रामाण्यरूपी सूर्याचा ग्रास करणारा जणू तो राहू ग्रहच असतो. खळ हा दुसऱ्याचे वाईट करण्याविषयी सहस्रबाहू असतो. दुसऱ्याचे केवळ दोष बघण्याकरिता त्याला हजार डोळे असतात. दुसऱ्याची निंदा करण्याविषयी त्याला हजार तोंडे असतात. दुसऱ्याची निंदा ऐकण्याविषयी त्याला हजार कान असतात. याप्रमाणे जणू तो दुसऱ्याच्या अहिताविषयी 'विराट पुरुष' बनलेला असतो.

Scanned by CamScanner

खळ हा दुसऱ्याच्या हितरूपी दुधात पालीसारखा गरळ ओकीत असतो. अन्नात, दुधात, तुपात पडून मरणाऱ्या माशीप्रमाणे स्वत:च्या हितासह दुसऱ्याच्या हिताचा नाश करीत असतो. दुसऱ्याला कठोर बोलण्यात वज्र, दुसऱ्याला ताप देण्यात जणू अग्नी, रागावण्यात यम, पापसंपत्ती साठविण्यात कुबेर, दुसऱ्याला पापदान करायला लावण्यात जणू बली व जगात नाना प्रकारचे उत्पात घडवून आणण्यात जणू धूमकेतू असतो. म्हणूनच अशा खळांचे ठिकाणी असलेले काम, क्रोध, लोभ, इत्यादी वैकारिक भाव गेले पाहिजेत. शिवाय समाजात, कुटुंबात, राज्यकर्त्यांत एक जरी खळ असला तरी तो आपल्या संगतीने इतरांना बिघडून टाकतो. विड्याच्या पानांच्या गड्डीत एक जरी सडलेले पान असले तरी ते आपल्या संगतीने इतर पानांना नासून टाकते. म्हणून खळाचे ठिकाणी असलेले आचार-विचारांचे दुष्टपण गेल्याशिवाय समाजाचे शुद्धीकरण होत नाही. म्हणून खळांचा दुष्टपणा जावा अशी पहिली प्रार्थना आहे.

Scanned by CamScanner

दुसरी प्रार्थना

अवतरण : पण खळाची दुष्टपणापासून निवृत्ती झाली तरी ती स्थिर राहणे महत्त्वाचे आहे. त्याची बुद्धी पुन्हा दुष्ट न होणे हिताचे आहे. याकरिता दुसरी प्रार्थना करतात.

तया सत्कर्मीं रति वाढो।

त्या दुष्टांची वेदप्रणीत सत्कर्मांचे ठिकाणी आवड निर्माण होवो. कारण सत्कर्मानुष्ठानाने वाढत्या क्रमाने संस्कार होत होत तो खळ, मुक्त व संत होऊ शकतो असा त्या सत्कर्मांचा प्रभाव आहे. वेदप्रणीत सत्कर्मांचे प्रथम, मध्यम आणि उत्तम असे तीन प्रकार आहेत. त्यापैकी प्राथमिक सत्कर्मे अशी :

तीर्थें बाह्य मळ क्षाळें। कर्में अभ्यंतर उजळें।
एवं तीर्थें जाण निर्मळें। सत्कर्मेंची॥ (अ. १८.१६०)

'यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणां'

या श्लोकाच्या व्याख्यानाच्या संदर्भात श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. यज्ञ, दान, तप ही सत्कर्मे गंगादी तीर्थापेक्षाही निर्मळ तीर्थे आहेत. गंगादितीर्थांनी देहाचा बाह्य मळ धुतला जातो. पण या सत्कर्मांनी अंत:करण स्वच्छ, विवेकप्रकाशमान होते. म्हणून ही सत्कर्मे अंत:करण शुद्धीकरिता जणू पवित्र तीर्थेच आहेत. सारांश, यज्ञ-दान-तप या प्राथमिक सत्कर्मांनी खळाचे ठिकाणी चित्तशुद्धीचा संस्कार होतो.

माध्यमिक सत्कर्मे अशी :

संतासवे वसतां। योगज्ञानी पैसतां
गुरुचरण उपासितां। वैराग्येसीं॥
येणेंचि सत्कर्में। अशेषही अज्ञान विरमे।
जयाचें अहं विश्रामे। आत्मरूपीं॥ (अ. १५।४२२,४२३)

चित्तशुद्धीनंतर श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ संतांच्या संगतीत राहून, गुरुबुद्धीने संतांना

Scanned by CamScanner

शरण जाऊन त्यांची वैराग्यपूर्वक सेवा करावी आणि त्यांच्या मुखाने आत्मश्रवण करावे. 'आत्मा' ब्रह्म आहे असे अखंड निदिध्यासन करावे व ब्रह्माचे आत्मत्वाने प्रत्यक्षज्ञान संपादन करावे. अशा सत्कर्मांनी अज्ञान नष्ट होऊन देहादी जड पदार्थांवरचा आत्मभाव जाऊन तो आत्मस्वरूपाचे ठिकाणी स्थिर होतो. या सत्कर्मांनी चित्त शुद्ध झालेला पुरुष मुक्त होतो.

उत्तम सत्कर्मे अशी :

तेथ सत्क्रीयाची लावावी। तेची एकी प्रशंसावी।
निष्कर्मी दावावी। आचरोनी॥ (अ. ३।१७४)

ज्ञानी हा स्वत: निष्कर्म झालेला असला व त्याला स्वत:ला सत्कर्म करण्याचे प्रयोजन राहिले नसले तरीसुद्धा असत्कर्माच्या मार्गाला लागलेल्या लोकांना सत्कर्माच्या मार्गावर आणण्याकरिता स्वत: साधकावस्थेत आचरलेल्या सत्कर्माचेच आचरण करावे व त्याचीच प्रशंसा करावी. अज्ञांचा बुद्धिभेद होईल अशा रीतीने नैष्कर्म्य अवस्थेची प्रशंसा करू नये. ती नैष्कर्म्यअवस्था स्वत:च्या अनुभवापुरतीच मर्यादित ठेवावी व अज्ञलोकांकरिता सत्कर्मांची स्तुती करावी.

अशा तीन प्रकारच्या सत्कर्मांविषयी खळाची आवड वाढली तर तो खळ एका काळी नीच, क्रूर, दुष्ट, कामी, विषयासक्त, परपीडक असलेला पण तो प्राथमिक सत्कर्मनि प्रथम शुद्धचित्ताचा होतो. नंतर माध्यमिक सत्कर्मांनी ज्ञानी मुक्त होतो. आणि उत्तम सत्कर्मांनी परोपकारी संत होतो. अशा त्या खळाच्या अवस्था पालटतात. म्हणून 'तया सत्कर्मी रती वाढो।' अशी प्रार्थना करतात.

Scanned by CamScanner

तिसरी प्रार्थना

अवतरण : खळांची व्यंकटी नष्ट झाली असता अनीतीचे उच्चाटन होते. तरीपण समाजात परस्परांमध्ये मित्रभाव निर्माण झाला पाहिजे. याकरिता तिसरी प्रार्थना करतात.

भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें।

भूतांत परस्पर द्वेष, मत्सर, असूया, द्रोह, हिंसक प्रवृत्ती, प्रतिकूलता असेल तर कोणालाही सुखसमाधानाने जगणे अशक्य होत असते. याकरिता परस्परांत जीवाभावाचे मित्रत्व असणे आवश्यक आहे. अर्थात सर्वांनी सर्वांच्या उत्कर्षाकरिता झटणे, कोणीही कोणाचा हेवा न करणे, दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणे, दुसऱ्याच्या सुखाने सुखी होणे, दुसऱ्याच्या संकटकाळी सहाय्याकरिता धावून जाणे असा जीवभावाचा मित्रभाव निर्माण झाला पाहिजे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी या ओवीत 'भूत' शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे. 'मनुष्य' किंवा प्राणी हे शब्द वापरले असते तर त्याचा अर्थ संकुचित झाला असता. केवळ माणसामाणसांत किंवा अखिल प्राण्यांतच मित्रभाव निर्माण व्हावा असे नाही, तर पंचमहाभूते, भौतिक पदार्थ, पशुपक्षी, राजा-प्रजा, बंधु-बंधु, पिता-माता-पुत्र, आप्त-इष्ट, नातेवाईक, गुरु-शिष्य, शिक्षक-विद्यार्थी, स्वदेशीय-परदेशीय, स्वप्रांतीय-परप्रांतीय या सर्वांत मित्रभाव निर्माण झाला पाहिजे.

आकाश, वायू, अग्नी, जल, पृथ्वी ही भूतेदेखील परस्परांत मित्रभावाने राहावीत आणि ती प्राणिमात्रांशीही मित्रभावाने राहावीत. श्रीगुरुदेवा, तुम्ही विश्वात्मक आहात तसेच विश्वेशराव आहात. विश्वाचे ईशान-नियंत्रण करणारे इंद्रादिक, अष्टलोकपाल, अष्टदिक्पाल यांचेदेखील तुम्ही राव-राजे असल्यामुळे साऱ्या विश्वावर तुमची अधिसत्ता आहे. तुम्ही म्हणाल तसे जगात घडून येईल याकरिता तुमच्या प्रासादिक वराने पंचमहाभूते व मनुष्यादी प्राणी यांच्यात जीवाभावाचे मित्रत्व निर्माण व्हावे अशी माझी प्रार्थना आहे.

आकाशातून विद्युत्पात उल्कापात होऊन वृक्षलतांचा व प्राणिमात्रांचा संहार न

Scanned by CamScanner

होवो, वायूचे आवरण शांत राहो. वादळी वाऱ्याने वृक्ष-लतांचा संहार व त्यापासून मनुष्यादी प्राण्यांना उपद्रव न होवो, अग्नी हा अतिप्रक्षोभक होऊन जंगलांचा, गावांचा, घरांचा, पशुपक्ष्यांचा दाह करणारा न होवो. तो नेहमी जठराग्निरूपाने प्राण्यांना अन्नपचनास व उत्तम अन्न शिजविण्यास अनुकूल राहो. अतिवृष्टी किंवा अनावृष्टी न होवो. ही पृथ्वी अखंड सस्य-फल-पुष्प- वनस्पतीशालिनी होवो. मनुष्याचेही पचमहाभूतांवर प्रेम असो. वृक्ष-वल्ली देखील मनुष्यांना सोयरी वाटावीत. माणसांकडून जंगले तोडली जाऊन विकसित झाडांचा नाश न होवो. गाई-म्हशी-घोडे-बैल इत्यादी पशू मनुष्यांना अनुकूल व उपयुक्त होवोत. पशु-पक्ष्यांची हिंसा करून त्यांचे मांस खाण्याचा लोभ माणसांत निर्माण न होवो. शिबिराजाप्रमाणे पशु-पक्ष्यांचे प्राण वाचविण्याची इच्छा मनुष्यात होवो व पशुपक्ष्यांविषयी अहिंसक प्रेम निर्माण होवो.

तसेच राजा व प्रजा यांच्यात पारस्परिक प्रेम व आदर निर्माण होवो. बंधु-बंधु; पति-पत्नी, माता-पिता-पुत्र, आन्तरप्रांतीय व आंतरदेशीय लोकांत पारस्परिक जीवाभावाचे मित्रत्व निर्माण होवो.

काय ही ज्ञानदेवांची उदात्त मागणी आहे! अशा व्यापक स्वरूपाने मित्रभाव निर्माण झाला तर समाजात कलह, द्वेष, मत्सर, असूया यांना स्थानच राहणार नाही. राजसत्तेला दंडनीतीचा उपयोग करण्यास अवसरच मिळणार नाही. प्रजेत निदर्शने, मोर्चे, सत्याग्रह, घेराव, इत्यादी प्रकार घडणार नाहीत. राष्ट्राराष्ट्रांची युद्धखोरी, गुंडांची गुंडगिरी, प्रजेची बंडखोरी, राजसत्तेची पाशवी आसुरी कायदेगिरी बघायला सुद्धा सापडणार नाही. सर्वत्र विश्वशांतीची प्रसन्नता अनुभवास येईल.

Scanned by CamScanner

चवथी प्रार्थना

दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥ (ज्ञा. १८/१९७४॥

अवतरण : समाजाची सुधारणा किंवा कुधारणा समाजाच्या चांगल्या व वाईट कर्मावर अवलंबून आहे. समाजातून वाईट कर्म जोपर्यंत जाणार नाही, तोपर्यंत सुधारणा होणे शक्य नाही. म्हणून ही चवथी प्रार्थना आहे.

(४) दुरितांचें तिमिर जावो।

दुरित-म्हणजे पाप, विश्वातून या पापाचा अंधकार जावो. वेदाने, शास्त्राने व संतांनी जे कर्म वाईट, निंद्य, निषिद्ध, अविहित, अकार्य म्हणून ठरविले आहे, त्याला दुरित म्हणतात, व जे कर्म चांगले, श्लाघ्य, विहित, कार्य म्हणून ठरविले आहे त्याला धर्म म्हणतात. वेद, शास्त्र व संत यांच्यावाचून दुरित कोणते व धर्म कोणता? याविषयी निर्णय घेण्याचे दुसरे साधन असू शकत नाही. म्हणून –

'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ'

धर्माधर्माच्या निर्णयाविषयी शास्त्र हेच प्रमाण आहे, असे श्रीभगवान म्हणतात.

बहुसंख्य माणसे जे कर्म आचरितात त्याला धर्म म्हणता येत नाही, आणि जे आचरित नाहीत त्याला दुरित म्हणता येत नाही. कारण, पुष्कळ लोक दारू पितात, व मांस खातात म्हणून तो धर्म नव्हे. तसेच पुष्कळ लोक ईश्वरभक्ती करीत नाहीत. म्हणून तो अधर्म नव्हे. अर्थात बहुसंख्य समाजाचे आचार हा धर्माधर्मांविषयी प्रमाणभूत असू शकत नाहीत.

तसेच कायदा हा देखील धर्माधर्माविषयी प्रमाणभूत असू शकत नाही. कारण (१) कायदा अस्थिर असतो, प्रत्येक वेळी बदलतो. त्या त्या बदलाचे देशनेत्यांकडून समर्थनही केले जाते. त्यामुळे कायद्यात स्थिर स्वरूपाची मानवी मूल्ये असू शकत नाहीत.

(२) कायदा मनुष्यकृतच असल्यामुळे कायद्यात मनुष्यबुद्धीत असलेला भ्रम,

Scanned by CamScanner

स्वार्थीपणा रागद्वेषादी विकार, स्वपक्षाचा दुराभिमान या गोष्टी असणे अस्वाभाविक नाही.

(३) कायद्याच्या विधिविषेधावर धर्माधर्म अवलंबून नाहीत. कारण, आजच्या कायद्यात दाराशी आलेल्या भिकाऱ्याला मूठभर धान्य अथवा चतकोर भाकरी वाढावी, असे विधान नाही. पण जर एखाद्या उदार मनुष्याने भिकाऱ्याला अन्न वाढल्यास शास्त्रानुसार धर्म मात्र घडतो. कायद्यात मांस भक्षण करू नये, असा निषेध नाही. पण मांस भक्षण केल्याने शास्त्रानुसार दुरित घडते. कायद्यात गोहत्या करणे पाप मानले नाही. पण शास्त्रानुसार गोहत्या करणे पाप आहे.

म्हणून दुरित व स्वधर्म यांचा निर्णय शास्त्रच घेऊ शकते. सारांश, दुरित म्हणजे निषिद्ध कर्मांचा अंधार गेला पाहिजे. जोपर्यंत मानवी जीवनात दुरितांचा अंधार आहे, तोपर्यंत मनुष्यदेह किती महत्त्वाचा आहे ? या देहाचे मुख्य प्रयोजन कोणते ? स्वत: आपण नीतिमत्तेने वागलो असता स्वत:सह कुटुंबाची व समाजासह राज्याची राखलेली सुस्थिती किती मंगलप्रद असते. स्वधर्मने जीवन किती पवित्र होते. ईश्वरभक्तीत किती आनंद असतो, ब्रह्मज्ञानात किती समाधान असते ही विचाररत्ने दिसणार नाहीत, त्यामुळे दुरितांच्या अंधारात सापडलेला मनुष्य दारू पिऊन ठेचाळत, झोकांड्या खात चालेल. विचाराचा तोल सुटून कोण्याही माता-भगिनींना काहीही अश्लील बोलेल; देहाचा तोल सुटून स्वपत्नीला मारहाण करील. प्रसंगी गटारात पडेल व वेश्येच्या घरी जाऊन लोळत पडेल. पैसा नसेल तर तिचा मार खाईल. सरकारने जमीन दिली तरी मांस, मद्य, परस्त्री, तमाशा, नाटक, सिनेमा, जुगार, ऐपतीपेक्षा उंची राहणीमान, खाणे-पिणे, कपडे यापायी ती जमीन विकून टाकील. कर्जबाजारी होऊन त्याच्या घरादाराचा सत्यानाश होईल. मुले-बाळे-बायको परागंदा होतील. नाना प्रकारचे रोग अंगाला जडून राहतील. शेवटी भीक मागेल हे दुष्ट दु:ख दुरितामुळे प्राप्त होते. शिवाय पारलौकिक नरकाचे दु:ख आणि पुढच्या जन्मात विष्ठा खाणाऱ्या डुकर-कुत्री इत्यादी योनीत जन्म प्राप्त होईल. भगवान् म्हणतात– अर्जुना, 'जयाचें ऐहिक धड नाहीं। तयाचें परत्र पुसशीं काई ?'

ज्यांचे या जन्मात कर्म चांगले नाही, त्याला परलोकात वा परजन्मात सुख मिळेल काय असे विचारतोस कसा ? जो या जन्मातच दारू पिऊन गटारात स्थान मिळवितो, तो स्वर्गातील इंद्राच्या सिंहासनावर बसेल कसा ? जो या जन्मातच देव-धर्माची निंदा करतो, त्याला विष्णुदूत वैकुंठाला नेतील कसे ? जो येथेच तुळशी उपटून निवडुंग लावतो, त्याला स्वर्गातील नंदनवन बघण्यास तरी मिळेल काय ? जो येथेच गाईची हत्या करतो, त्यावर कामधेनू प्रसन्न होईल काय ? जो या जन्मात

Scanned by CamScanner

भिकारी-अतिथी- अभ्यागतांना ऐपत असून अन्नदान करीत नाही, तो कुत्र्याच्या जन्मात सुखाने भाकर खाईल काय? जो या जन्मातच वेदाचे व श्रीगुरूचे वचन प्रमाण मानीत नाही, तो गाढवाच्या देहात मानील काय? जो या देहातच दुसऱ्याच्या देहाचे मांस खातो, तो कोंबडा वा बकरा झाल्यावर कोणी त्याला जिवंत ठेवण्याकरिता पोशील काय? जो या जन्मात काळा बाजार करतो, भेसळीचा माल देतो, दुधात पाणी टाकतो, नकली माल देऊन लोकांचे आरोग्य बिघडवतो, त्याच्याकरिता यमलोकांत प्रतिष्ठित स्थान राहील काय?

सारांश, दुरितांमुळे व्यक्तिजीवनाची शोकांतिका होते, असे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.

तैसीं त्रिभुवनींचीं दु:खें। आणि नानाविधें पातकें।
दैन्यजात तितुकें। तेथेंचि वसे॥ (अ. ३।११४)

दुरिताचरण करणाऱ्याला त्रिभुवनातील दु:खे भोगावी लागतात. एका दुरिताचरणापासून अनेक दुरिताचरणे परंपरेने घडतच राहतात. त्यामुळे दु:ख-दारिद्र्य प्राप्त होते. ही झाली व्यक्तिजीवनाची दु:स्थिती. आता पूर्ण मानव समाजच जर दुरिताचरणाकडे प्रवृत्त झाला तर त्या सामाजिक दुरितामुळे अतिवृष्टी अनावृष्टी, भूकंप आणि साथीचे रोग निर्माण होतात.

देव: वर्षति न वा वर्षति कामं वा वर्षति।

असे 'चरक' नावाच्या वैद्यक ग्रंथात म्हटले आहे.

सारांश, सामाजिक दुरितामुळे सामाजिक जीवनाचाच विध्वंस होतो. आता राज्यकर्तेच जर दुरिताकडे प्रवृत्त झाले तर त्यांचे ते राज्यशासन सुशासन न राहता दु:शासन होते. राजा किंवा राज्यकर्ते मंत्री यांच्यात दुरिते कोणती असू शकतात, यासंबंधी विचार राजनीतिशास्त्राचे आचार्य श्रीकामंदक यांनी खालील श्लोकात मांडला आहे.

वाग्दण्डयोश्च पारुष्यमर्थदूषणमेवच।
पानं स्त्री मृगया द्यूतं व्यसनानि महीपते:॥
आलस्यं स्तब्धता दर्प: प्रमादो वैरकारिता।
इति पूर्वोपदिष्टं च सचिवव्यसनं स्मृतम्॥ (कामंदक नीतिसार १४)

(१) निकडीचे व महत्त्वाचे किंबहुना जीवन-मरणाचे काम घेऊन येणाऱ्या गरजू

Scanned by CamScanner

नागरिकास त्यांचे काम न करता कठोर बोलून हाकलून देणे.

(२) कठोर व बलात्कारी कायदे करणे.

(३) मनुष्याची गरज, व त्याची संकटग्रस्त अवस्था पाहून त्याचे काम करण्याकरिता लाचलुचपत खाणे.

(४) मद्यपान करून अखंड नशेत राहणे.

(५) परस्त्री व वेश्या यांच्याशी संबंध ठेवणे.

(६) पत्ते, जुगार खेळण्यात वेळ घालविणे.

(७) शिकारीचा नाद असणे, वन्य पशूंची हिंसा करणे.

(८) राजकीय कामाविषयी आळस करून ते काम वेळेवर न करणे.

(९) कोणाशीही मोकळेपणाने न वागणे.

(१०) राजसत्तेचा व स्वत:च्या शहाणपणाचा अति अभिमान असणे.

(११) राज्यकारभारात दक्षता न ठेवता गोंधळ करणे, चुका करणे, राज्यकारभाराची माहिती नसणे. भोंगळपणाने महत्त्वाची कागदपत्रे गहाळ करणे, शत्रूच्या हातात जाणे, स्वराष्ट्रात शत्रूचा प्रवेश होऊ देणे, संरक्षणाची चूक करणे.

(१२) सभ्य, विद्वान, सत्प्रवृत्त, दीन, दुबळे इत्यादी नागरिकांशी वैर करणे, त्यांना कडक शासन करणे.

ही राजाची आणि मंत्र्यांची व्यसने म्हणजेच दुरिते आहेत. या दुरितामुळे राज्यनाश होतो. 'तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे' असे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात. याकरिता राज्यकर्त्यांनी राज्यसंस्था व्यवस्थितपणे चालविण्याकरिता चार प्रकारच्या विद्यांचा आधार घेतला पाहिजे, असे श्रीकामंदक सांगतात.

राज्यकर्त्याला सर्व विश्वावर अंतिम सत्ता ईश्वराची आहे हे ज्ञान असावे.

गतिर्भर्ता प्रभुस्साक्षी निवास: शरणं सुहृत्।
प्रभव: प्रलय: स्थानं निधानं बीजमव्ययम्॥ (अ. ९।१८)

या गीतेच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे ईश्वराच्या सर्व प्रकारच्या सामर्थ्याचे अंगोपांगासह ज्ञान असावे.

तसेच राज्यकर्त्याला आत्मा देहातीत आहे. देह मरणारा व आत्मा अमर आहे. जीवात्मा कर्माधीन आहे. जीवाला पापपुण्यकर्मानुसार भावी जन्मात सुख-दु:खे भोगावी लागतात याचे ज्ञान असावे. याला 'आन्वीक्षिकी' विद्या म्हणतात.

तसेच वर्तमान व्यक्तिजीवन, सामाजिक जीवन, देश, काल, परिस्थिती, धर्म, परलोक, उत्तरजन्म, वेद व गुरू यांच्यावर विश्वास व त्यांचे फल या सर्वांचे सूक्ष्म

Scanned by CamScanner

व अचूक ज्ञान असावे व त्याकरिता निर्दोष असलेल्या प्रत्यक्ष, अनुमान व वेद यांचा आधार घेणे याला 'त्रयी' विद्या म्हणतात.

तसेच राज्यकर्त्यांनी शेती, उद्योग, धंदे, व्यापार, पशुपालन यांना उत्तेजन देऊन आर्थिक विकास व इतर भौतिक सुधारणा करणे याला 'वार्ता' विद्या म्हणतात व या तीन 'विद्या' राज्यात सुस्थिर राहण्याकरिता घटना व कायदे करणे याला 'दण्डनीति' विद्या म्हणतात. घटना व कायदे सृष्टीतील मूळ कारणे लक्षात घेऊन करावेत. ती मूळ कारणे अशी–

जगत्कर्ता ईश्वर, त्याचे शासन, त्रिगुणात्मक प्रकृती व तिने निर्माण केलेले जगातील वैषम्य, मनुष्याचे पूर्व जन्मातील पाप-पुण्यात्मक संचित कर्म, भोगाचे संस्कार, ज्या वर्णात व ज्या कुलात मनुष्य प्राणी जन्माला आला त्या वर्ण-कुलांतील धर्म, जन्मदात्या आई-बापापासून आलेले आनुवंशिक संस्कार, मानवी देह, इंद्रिये, मन, बुद्धी, यांचे स्वभाव, मनुष्याचा स्वत:च्या कुटुंबियाशी, समाजाशी, नातेवाईकांशी, ग्राम-देशवासीयांशी येणारा प्रेमाचा संबंध; तसेच धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार प्रकारच्या फलांची मनुष्याला असणारी इच्छा हे सर्व लक्षात घेऊन कायदा करणे याला 'दण्डनीति' म्हणतात व ही दण्डनीति व्यक्ती, समाज व राज्य यांच्या सुव्यवस्थेकरिता, शांततेकरिता, सुख-समाधानाकरिता किंबहुना सर्व प्रकारच्या समृद्धीकरता आवश्यक आहे.

व्यक्तीत व समाजात दुरिताचा प्रसार राज्यकर्त्यांच्या दुरितांवर बहुधा अवलंबून असतो. म्हणून राज्यकर्त्यांतील दुरितें जाण्याकरिता त्यांनी या चार विद्यांचा आश्रय करावा तर राज्यकर्त्यांना स्वत:च्या बुद्धीने आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता आणि दंडनीती या चार प्रकारच्या विद्यांचे रहस्य समजत नसेल तर त्यांनी विद्यावृद्ध आचार्यांकडून त्या समजून घ्याव्यात. विद्यावृद्ध आचार्यांचे लक्षण श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात-

परी श्रुतिस्मृतींचे अर्थ। आपण होवोनियां मूर्त।
अनुष्ठानें जगा देत। वडिल जे जें॥ (अ. १७।८६)

अशा विद्यावृद्धापासून विद्या मिळवावी. अशी विद्या पूर्वीच्या श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण इत्यादी राजे लोकांनी वसिष्ठ-सांदिपनीकडून मिळविली होती. श्रीपुण्यश्लोक शिवाजीमहाराजांनीदेखील श्रीसमर्थ रामदास श्रीजगद्गुरु तुकाराममहाराज यांच्यापासून मिळविली होती, म्हणून त्यांच्या राज्यांतून दुरिताचा काळोख गेला होता.

सारांश, व्यक्तिजीवन, समाजजीवन आणि राजशासन या तीन प्रदेशांत दुरिताचा अंधार कुठेच नसावा असा 'दुरितांचे तिमिर जावो' याचा व्यापक अर्थ घेतला,

Scanned by CamScanner

तरच विश्वकल्याणाच्या संदर्भानुसार तो योग्य ठरेल. कारण, ज्ञानदेवांची कोणतीही विचारसरणी दूरगामी असते. व्यक्ती, समाज व राजशासन, या तीन प्रदेशांपैकी कोणत्याही एक वा दोन प्रदेशांत दुरिताचा अंधार असेल तर 'दुरितांचे तिमिर जावो' ही मागणी संकुचित अर्थाची होईल. याकरिता या तीनही प्रदेशांतून दुरिताचा अंधार जावा. हीच ज्ञानदेवांची प्रार्थना आहे.

Scanned by CamScanner

पाचवी प्रार्थना

अवतरण मनुष्याच्या जीवनातून पापाची क्रिया निघून गेली तरी त्या जागी चांगली क्रिया असणे व ती स्थिर राहणे आवश्यक आहे. मनुष्य एक क्षणभरदेखील क्रियाशून्य राहू शकत नाही. पण परिणामी दुष्फल किंवा निष्फल क्रिया करण्यातही काही अर्थ नसतो. याकरिता सफल व चांगली क्रिया करणे आवश्यक ठरते. म्हणून पाचवी प्रार्थना करतात.

'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो'।

हे विश्व स्वधर्मसूर्याने प्रकाशित होवो. या ओवीतील स्वधर्म शब्दाचा अर्थ–"स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धिं लभते नर:" या श्लोकांत स्व आणि कर्म या शब्दांत जो अर्थ अभिप्रेत आहे तोच स्वधर्म शब्दाचा अर्थ आहे. जगातील पशु-पक्षी किंवा कोणतेही जड पदार्थ यांना सोडून मनुष्यप्राण्याकरिता एक विशेष कर्तव्य आहे. कारण मनुष्यदेहातील कर्तव्यावरच मनुष्याच्या भावी जन्मातील वा भावी काळातील हिताची जडण-घडण अवलंबून आहे. मनुष्यदेहात घडणाऱ्या कर्माची फळे सांगताना श्रीज्ञानेश्वर महाराज पंधराव्या अध्यायांत म्हणतात- 'वेदनिषिद्ध पापकर्मे केल्यास नरकदु:ख व पशुपक्ष्यांच्या देहाची प्राप्ती ही फले आहेत. वेदविहित पुण्यकर्मे सकाम बुद्धीने केल्यास परलोकसुख व इंद्रादिक देवदेहाची प्राप्ती ही फले आहेत. निष्काम पुण्यकर्मे केल्यास चित्तशुद्धिपूर्वक मोक्ष हे फल आहे. हा कर्माचा व भावी फलाचा कार्यकारणभाव लक्षात येण्यास बुद्धीची अडचण निर्माण होते. कारण बुद्धीला हे सर्व असंभवनीय वाटते. पण कर्मे केल्यानंतर लागलीच फळ मिळत नसते, त्याला काही काळ लागतो. हे आपल्याला व्यावहारिक कार्यकरणभावावरूनही सिद्ध करता येईल. शेतात आज पेरल्याबरोबर उद्याच कणीस येईल असे नाही. त्याकरिता काही काळाची गरज आहे. या उदाहरणावरून या देहात केलेल्या कर्माचे फळ अतिदीर्घ काळानंतर प्राप्त होते व ते चांगल्या वाईट कर्माच्या तारतम्यानुसार प्राप्त होते, हेही आपण समजू शकतो. पण पूर्व जन्म होता काय ? आणि वर्तमान जन्मानंतर उत्तरजन्म असेल काय ? आणि या जन्मात केलेल्या

Scanned by CamScanner

कर्माचा पुढील जन्माशी संबंध कसा? हेच काय ते बुद्धीला कोडे उलगडत नाही. म्हणून माणसे नास्तिक होतात आणि स्वधर्माच्या विरुद्ध बंड कातात. पण सूक्ष्म-दुर्बलभाव जेथे असतो तेथे असा प्रकार घडणे स्वाभाविक आहे. एखादा विषय सूक्ष्म आणि त्याच्या ज्ञानाचे साधन दुर्बल जेव्हा असते तेव्हा साधनाची दुर्बलता आणि विषयाची सूक्ष्मता विचारात न घेता मनुष्य उपलब्ध साधनावर विश्वास ठेवून भावी विषयाबद्दल अविश्वास व्यक्त करीत असतो. बुद्धी आणि कर्माची भावी फले यांच्यात असाच प्रकार आहे. या जन्मात केलेले कर्म आणि भावी जन्मात प्राप्त होणारे फल हा कार्यकारणभाव सूक्ष्म अतएव अदृष्ट आहे, आणि त्याचे संशोधन करणारी बुद्धी या विषयांत दुर्बल आहे. त्यामुळे या सूक्ष्म कार्यकारणभावापर्यंत बुद्धी जाऊ शकत नाही आणि तो कार्यकारणभाव बुद्धीत प्रवेश करू शकत नाही. डोळा हा बाहेरच्या रूपापर्यंत जातो आणि शब्द हा वायुलहरीच्या द्वारा कानात प्रवेश करतो. पण आंधळ्याला रूप दिसत नाही व बहिऱ्याच्या कानात शब्द प्रवेश करू शकत नाही. इंद्रियाने विषयापर्यंत जाणे डोळ्याच्या बाबतीत संभवते आणि विषयाने इंद्रियापर्यंत येणे शब्दाच्या बाबतीत संभवते. पण एखादेवेळी विषयापर्यंत इंद्रिये जात नाहीत आणि विषयही इंद्रियापर्यंत येऊ शकत नाही. अंत:पुरातील पडद्यात असलेल्या राजस्त्रियांचे रूप सामान्य माणसाचे डोळे पाहू शकत नाहीत व त्या स्त्रियाही राजावाचून इतरांच्या डोळ्यासमोर येऊ शकत नाहीत. त्याप्रमाणे वर्तमान जन्म आणि भावी जन्म यांच्यात देहाच्या मरणाचे एक व्यवधान आणि कर्म व फल यांच्यांत प्रदीर्घ कालाचे दुसरे व्यवधान आहे. या दोन व्यवधानामुळे बुद्धी ही कर्मफलातील कार्यकरणभावापर्यंत जाऊ शकत नाही. कारण ती सर्वज्ञ नाही व हा कार्यकारणभाव बुद्धीत प्रविष्ट होत नाही. कारण तो सूक्ष्म आणि भावी आहे. लहानशा चिमटीने वारा पकडण्याचा प्रयत्न जसा हास्यास्पद आहे. कारण, वारा गतिमान व सूक्ष्म, आणि चिमटी लहान व स्थिर असते. पण एखाद्या रबरी नळीत पंपाने बाहेरचा वारा आत ओढता येतो व बूच लावून बंद करून ठेवता येतो. त्याप्रमाणे कर्म-फलांतील कार्यकारणभाव आणि पूर्वोत्तर जन्माचे अस्तित्व बुद्धीला व इंद्रियांना अगम्य असले तरीसुद्धा वेदाला ते सर्व विषय कळतात. आणि वेदाला प्रमुख मानून नंतर बुद्धीलाही ते कळू शकतात ते असे-

(१) कोणत्याही प्राणिजातीतील आईपासून झालेले मूल आईच्या स्तनाला नेमके तोंड लावते व स्तनात दूध असते व ते विशिष्ट पद्धतीने तोंडाने ओढले असता त्यातून निघालेले दूध आपल्या पोटात जाते व आपले पोट भरते हे नवबालकाला

Scanned by CamScanner

कोणीही न शिकविता ज्या अर्थी कळते त्याअर्थी हा संस्कार पूर्वजन्मातीलच असला पाहिजे असे अनुमान करता येते. याच रीतीने भयादी विकाराचे, निद्रेचे व मैथुनाचे संस्कार देखील पूर्वजन्मातीलच असले पाहिजेत असेही अनुमान करता येते. सारांश, 'संस्कार' या हेतूवरून पूर्वजन्माचे अस्तित्व सिद्ध होते.

(२) वर्तमान देहात नानाप्रकारची सुख-दुःखे प्राप्त होतात व त्यांची कारणे या जन्मात कोणतीही आढळत नाहीत. त्याअर्थी पूर्वजन्मात त्यांची विविध कारणे घडली असावीत व तो कार्यकारणभाव सूक्ष्म, व अतींद्रिय आहे असेही अनुमानाने सिद्ध होते.

म्हणून, मनुष्याच्या वर्तमान हिताबरोबरच भावी हिताची उत्पत्ती स्वधर्मानि होत असल्यामुळे विश्वात स्वधर्मसूर्याचा उदय झाला पाहिजे.

वेदाने अथवा वेदानुसारी गीतादी ग्रंथांनी ज्याच्याकरिता जे कर्तव्य सांगितले आहे, तो त्याचा स्वधर्म होय. राजाने प्रजेचे न्यायाने पालन, पोषण, प्रसादन करणे हा राजाचा वा लोकशाहीतील सत्ताधाऱ्याचा स्वधर्म होय. पुत्राने पित्याच्या आज्ञेने वागणे हा पुत्राचा स्वधर्म, मातेने मुलाचे संगोपन करणे हा मातेचा धर्म, पित्याने पुत्राच्या भावी कल्याणाची काळजी घेणे, मुलाला शिक्षण देणे, धर्माकडे प्रवृत्त करणे, दुर्व्यसनापासून अलिप्त ठेवणे, धनार्जन करणे, हा पित्याचा धर्म आहे. जगाची उत्पत्ती, स्थिती, लय करणे, प्राणिमात्राला कर्मानुसार फल देणे, भक्तावर अनुग्रह करणे, धर्मस्थापना करणे, साधूचे परित्राण व दुष्टांचा नाश करणे हा ईश्वराचा धर्म आहे. ईश्वराचे ठिकाणी निष्ठावंत भाव ठेवणे हा भक्ताचा स्वधर्म आहे. गुरूने शिष्याला ज्ञान सांगणे, शिष्याने गुरूची सेवा करणे, हा गुरूचा व शिष्याचा स्वधर्म आहे. गुरूने शिष्याला ज्ञान सांगणे, शिष्याने गुरूची सेवा करणे, हा गुरूचा व शिष्याचा स्वधर्म आहे. समाजपुरुषाची नैतिक, धार्मिक व आध्यात्मिक पातळी उंचावण्याकरिता ज्ञान, राष्ट्रसंरक्षणाकरिता बल; आर्थिक व्यवहाराकरिता पैसा व धान्योत्पादन व भौतिक विकास याकरिता श्रम व सेवा यांची गरज असल्यामुळे ही चार प्रकारची कर्तव्ये निष्ठेने करणे हा चार वर्णाचा स्वधर्म आहे. अध्ययन करणे हा ब्रह्मचारीधर्म आहे. कुटुंबपोषण, अतिथींची व हरिभक्तांची सेवा, परोपकारीवृत्ती हा गृहस्थधर्म आहे. नव्या पिढीला कर्तव्याची संधी देऊन उतारवयात स्वतःच्या देहाचे आध्यात्मिक साफल्य करण्याकरिता तप करणे व ब्रह्मचिंतन करणे हा वानप्रस्थ व संन्यासी यांचा स्वधर्म आहे. पत्नीने काया-वाचा-मनाने पतिसेवा करणे व पत्नीला धर्म-अर्थ-काम-मोक्ष हे चतुर्विध पुरुषार्थ संपादण्यास सहाय्य करणे हा पतीपत्नींचा स्वधर्म आहे. असे अनेक स्वधर्म आहेत आणि हे सर्व स्वकल्याणाकरिता उपयुक्त

Scanned by CamScanner

असल्यामुळे या स्वधर्मरूपी सूर्याचा उदय झाला पाहिजे व या स्वधर्मरूपी सूर्याने हे विश्व प्रकाशित झाले पाहिजे. या अनेक स्वधर्मांना भगवंताच्या विश्वरूपाला दिलेली उपमाच शोभते ती अशी-

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुपत्थिता यदि भा:।

जर आकाशात हजारो सूर्यांचा एकदम उदय झाला तर तो प्रकाश जसा अतिक्रांत व प्रकृष्ट असू शकेल, त्याप्रमाणे विश्वातील प्रत्येक व्यक्तींनी स्वकर्तव्यस्वरूप स्वधर्माचे पालन केले तर त्या अनंत स्वधर्म सूर्याच्या उदयाने पापाचा काळोख, अधर्मरूपी घुबडांचा घुघुत्कार, इतस्तत: फिरणारे दुष्टरूपी निशाचरे, कामक्रोधादी हिंस्र श्वापदे आणि पक्षापक्षातील कोल्हेकुई हे सर्व पार लुप्त होऊन जिकडे तिकडे मांगल्याचा सुवर्णप्रकाश पडेल हे निश्चित.

Scanned by CamScanner

सहावी प्रार्थना

अवतरण – स्वधर्माच्या अनुष्ठानापासून कोणते फल प्राप्त होते ? या शंकेच्या परिहारार्थ सहावी प्रार्थना करतात.

जो जे वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥

जो प्राणी धार्मिक आहे तो जे फल इच्छील त्याला ते प्राप्त होवो. एखादा धार्मिक आर्त असेल आणि तो आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक अशा त्रिविध दु:खाच्या निवृत्तीची इच्छा करील तर त्याची ती दु:खे भगवत्कृपेने नष्ट होवोत. एखादा धार्मिक जिज्ञासु असेल आणि तो ब्रह्मज्ञानाची इच्छा करील तर त्याला गुरुकृपेने ज्ञान प्राप्त होवो. एखादा धार्मिक अर्थार्थी असेल, आणि तो धन-धान्य, सत्ता-संपत्ती यांची इच्छा करील तर त्याच्या स्वधर्मजन्य पुण्यप्रभावाने त्याच्याकडून अनुकूल प्रयत्न घडोत, त्याला इष्टमित्रांचे सहकार्य लाभो, त्याला राजसत्ता अनुकूल होवो व शेवटी त्यावर ईश्वराची कृपा होवो आणि त्याला सर्व भोग प्राप्त होवोत. स्वधर्म आणि भोगप्राप्ती या कार्यकारणभावात एक फार मोठे पवित्र रहस्य आहे. ते असे की, स्वधर्माच्या पोटी प्राप्त झालेले भोग भोक्त्याकडे नम्रभावाने येतात. **'नम्यंतेऽस्मै कामा:'** असे श्रुति सांगते. उदाहरणार्थ- व्यभिचारी-कामातुर मनुष्य आपण होऊन वेश्येकडे जेव्हा जातो तेव्हा ती वेश्या पैश्याच्या लोभाने व्यावसायिक दृष्टिकोणातून त्याच्याशी आभासिक प्रेमाचा व्यवहार करते. पैसे नसतील तर त्याच्याशी उद्धटपणे वागण्यासही कमी करीत नाही. पण वैदिक पद्धतीने विवाहसंस्कार झालेली धर्मपत्नी प्रेम व सेवा या पवित्र भावनेने आपण होऊन पतीकडे जाते. तसेच लाचलुचपत खाणाऱ्याकडे व चोरी-काळाबाजार, हिंसाचार करणाऱ्याकडे पैसा आपल्याबरोबर राजभय-चोरभय यांची संकटे घेऊन येतो व परिणामी त्यांचा तो नाश करतो. पण धर्म-नीतीने मिळविलेला पैसा नम्रभावाने येतो व तो मिळविणाऱ्याचा धार्मिक, नैतिक, आध्यात्मिक उत्कर्ष साधीत असतो. भोगेच्छु पुरुषाकडे धर्मजन्य पुण्याने सर्वभोग अति नम्रभावाने व आपोआप येतात

Scanned by CamScanner

असे श्रीज्ञानेश्वर महाराज तिसऱ्या अध्यायात सांगतात.

देखे सर्वसुखेंसहित। दैवचि मूर्तिमंत।
येईल देखा काढत। तुम्हापाठीं॥ १०१ ॥
ऐसें समस्त भोगभरित। होआल तुम्ही अनार्त।
जरी स्वधर्मेकनिरत। वर्ताल बापा॥१०२॥

या ओवीत स्वधर्म आणि भोगप्राप्ती यांचा कार्यकारणभाव दर्शविला आहे. भगवद्गीतेतही भगवान् म्हणतात, अर्जुना-

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि। (अ. २ श्लो ३१)

स्वधर्माकडे दृष्टी ठेवून देखील तू युद्धापासून परावृत्त होणे योग्य नाही. या उपदेशाचा परिणाम अर्जुनाच्या मनावर झाला व अर्जुन म्हणाला- देवा,

स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव॥ (अ. १८ श्लो. ७३)

मी तुझ्या उपदेशाने आत्मस्वरूपाचे ठिकाणी व स्वधर्माचे ठिकाणी स्थिर झालो आहे. मला आता आत्मस्वरूपाविषयी व कर्तव्याकर्तव्याविषयी संदेह राहिला नाही. मी तुझ्या आज्ञेप्रमाणे कर्तव्य करीन.

या अर्जुनाच्या भाषणाने देव संतुष्ट झाले. म्हणूनच त्या युद्धात अर्जुनाकडे दिलेला पाठिंबा देवाने शेवटपर्यंत राखला. जर देवाच्याविरुद्ध अर्थात स्वधर्माविरुद्ध अर्जुन वागला असता तर भगवंताने दिलेला पाठिंबा काढून घेतला असता, आणि संजयाला

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥ (अ. १८ श्लो. ७८)

असे म्हणता आले नसते.

सारांश, स्वधर्मनिष्ठाच्या पक्षाला देव असतो व स्वधर्मनिष्ठ आणि देव जेथे, तेथे लक्ष्मी, विजय, ऐश्वर्य हे सर्व असतात. हा संजयाचा ठाम सिद्धांत आहे. याच सिद्धातानुसार श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात- विश्वात जेव्हा स्वधर्मसूर्याचा प्रकाश पडतो तेव्हा ज्याला जे अपेक्षित असेल ते सर्व त्याला प्राप्त होतात.

सारांश, विश्वातील लोक स्वधर्मनिष्ठ जेव्हा होतात तेव्हा त्यांना सत्य, प्रिय हितकारक फले प्राप्त होतात. हा कार्यकारणभाव

Scanned by CamScanner

'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'
'जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥

या वाक्यात व्यक्त झाला आहे.

Scanned by CamScanner

सातवी प्रार्थना

अवतरण – मागच्या ओवीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' अशी प्रार्थना केली आहे. पण यावर एक शंका येणे स्वाभाविक आहे की, विश्वातील सर्व लोक वेदाला मानतील कसे? व स्वधर्मनिष्ठ होतील कसे? आणि असे जर होत नसेल तर ही प्रार्थना व्यर्थच आहे. कारण आज भारत देशात वेगवेगळ्या धर्माचे-मताचे-पंथाचे लोक आहेत. हे सर्व लोक एका वेदालाच प्रमाण मानून वेदप्रणीत धर्मनिष्ठ होतील कसे? दुसरे कारण असे की, श्री भगवान म्हणतात-

द्वौ भूतसर्गो लोकेस्मिन् दैव आसुर एवच। (अ. १६ श्लो. ६)

जगात अनादिकालापासून काही दैवी संपत्तीचे व काही असुरी संपत्तीचे लोक आहेत व असणारच. कारण, त्रिगुणात्मक प्रकृतीपासून चराचराची उत्पत्ती झाली असल्यामुळे लोकदेखील सात्विक, राजस, तामस असणारच व त्यांचे व्यवहारदेखील धार्मिक-अधार्मिक स्वरूपाचे असणारच. कोणी धार्मिक, भक्त, ज्ञानी, योगी, दयाक्षमाशील, शांत, मृदु, सहिष्णु, असणार तर कोणी अधार्मिक, अभक्त, नास्तिक, कुतार्किक, दुष्ट, क्रूर, हिंसक, स्वार्थी, लोभी, गुंड, चोर, जार, दुर्व्यसनी असणारच. हे जरी खरे असले तरीसुद्धा जे लोक आसुरी संपत्तिमान आहेत, त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचे सामर्थ्य ईश्वरनिष्ठ संतांत असल्यामुळे श्रीज्ञानेश्वर महाराज सातवी प्रार्थना करतात.

वर्षत सकळ मंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळीं। भेटो तयां भूतां ॥ १७९६ ॥

सदुपदेश आणि सदाचार या मांगल्याचा अखंड वर्षाव करणाऱ्या संतांचा समुदाय या भूमंडळावर सर्व भूतांना सतत भेटावा. ईश्वरनिष्ठ संतांच्या उपदेशाने समाजातील नास्तिकपणाचे अमांगल्य नष्ट होते. संत हेच खरे समाजाचे शिक्षक असतात. संताचे जीवन सुसंस्कृत असते. असंत माणसाने कुटुंब, समाज, देश यांच्या उन्नतीचे कार्य करण्याचा प्रयत्न केल्यास परिणामी निष्फल किंबहुना अनर्थावहच होते.

Scanned by CamScanner

शिक्षणतज्ज्ञ लोकांनी विद्यार्थ्यांना दिलेले शिक्षण आणि अशिक्षितांनी शहाणपणाचा आव आणून शिक्षणाच्या नावाखाली केलेली मूर्खांची दिशाभूल, यात जे अंतर, किंवा व्यवहारचतुर माणसाने केलेले काम आणि मूर्खाने केलेले तेच काम यात जे अंतर, तेच अंतर विश्वकल्याणाच्या संदर्भातही आहे. रागद्वेषरहित ईश्वरसाक्षात्कारी संतांनी जगाच्या कल्याणाच्या पवित्र उद्देशाने केलेले समाजप्रबोधनाच्या कार्यात जे मांगल्य असते ते स्वत:ला देशभक्त, दलितोद्धारक, गरिबांचे कैवारी म्हणवून घेणाऱ्या व सत्तापिपासा, धनाभिलाषा, महत्त्वाकांक्षा यांची ज्याच्या जीवनाला घाण सुटली आहे, अशा असंत मनुष्याने केलेल्या देशकार्यात नाही. म्हणून समाजाला योग्य वळण लावण्याचे कार्य संतच करू शकतात. ईश्वरनिष्ठ संत हे समाजाला स्वधर्माचरणांचे वळण लावण्याकरिता समाजात ईश्वराच्या अस्तित्वाची भावना रुजवितात. ती भावना अशी की, "श्रुति ही ईश्वराची आज्ञा आहे. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागणे मनुष्याचे कर्तव्य आहे. वेदविहित कर्तव्य मनुष्यास ऐहिक-पारलौकिक भोग आणि पारमार्थिक मोक्षसुख मिळवून देण्याचे साधन आहे, ही भावना ईश्वरनिष्ठ संत निर्माण करतात. ही भावना निर्माण करणाच्या पाठीमागे वस्तुस्थिती जशी आहे तसे एक महान मानवी मानसशास्त्रही आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, कायद्यापेक्षा वेद श्रेष्ठ आहे. वेदापेक्षा वेदाचा प्रकाशक ईश्वर श्रेष्ठ आहे. ईश्वरापेक्षाही समाजाशी प्रत्यक्ष संपर्क साधणारे वेदार्थवेत्ते ईश्वरसाक्षात्कारी संत श्रेष्ठ आहेत.

कायदा मनुष्याने केलेला असतो. मूलभूत घटना मनुष्यनिर्मित असते. त्यामुळे मनुष्याच्या बुद्धीत स्वाभाविक असलेले भ्रम व प्रमाद पुढच्या राज्यकर्त्यांच्या जेव्हा लक्षात येतात तेव्हा ते घटनेत दुरुस्त्या करतात. काही कायदे रद्द केले जातात. नवे नवे कायदे निर्माण होतात. वटहुकुमात तर शेवटी अनवस्थाच निर्माण होते. कायद्याची नीट अंमलबजावणी होत नाही. झाली तरी चुकीच्या पद्धतीने होते. कायदा हा मनुष्याच्या शरीरावर नियंत्रण ठेवतो, मनावर ठेवू शकत नाही. कायदा हा गुन्हा केल्यानंतर पोलिसाकडून पकडवितो, साक्षीपुराव्याने व वकीलाच्या युक्तिवादाने गुन्हा सिद्ध झाला तरच न्यायाधीशाकडून दंड-शिक्षा करवितो. ही झाली कायद्याची वस्तुस्थिती. आता वेदाची वस्तुस्थिती अशी की, वेदांत भ्रम-प्रमाद नाहीत. त्यामुळे वेदाच्या विधि-निषेधात दुरुस्तीचा प्रश्नच निर्माण होत नाही. वेदविहित धर्म मनावर सुसंस्काराचे नियंत्रण ठेवतो. त्यामुळे मनुष्याकडून गुन्हाच होऊ देत नाही. गुन्हा घडलाच तर ईश्वर त्याला गुन्ह्याच्या तारतम्यानुसार या जन्मातच किंवा दुसऱ्या जन्मात दु:खरूप फल देतो. ही सर्व वस्तुस्थिती ईश्वरनिष्ठ संत समाजाला समजावून

Scanned by CamScanner

सांगतात.

आता मानवी मानसशास्त्रीय धारणेचा क्रम बघितला तर त्यात उत्तरोत्तर श्रेष्ठपणा दिसून येतो. 'चोरी' या एकाच वाईट कृत्याचे उदाहरण आपण घेऊ. यावरून सर्व वाईट कृत्यांविषयींची मानवी मनाची धारणा लक्षात येईल.

पहिली धारणा अशी की, जे लोक वेद, धर्म, ईश्वर व संत यांना मानीत नाहीत, पण ज्यांच्या मनात कायद्याची साधारण भीती आहे अशा चोर इत्यादी दुष्ट लोकांना असे वाटते की, कमी श्रमाने पुष्कळ व फुकट पैसा मिळविण्याकरिता आपण चोरी करावी व ती शिताफीने करावी. पोलिसाने पकडलेच तर त्याला त्यातला वाटा देऊ. कदाचित खटला भरलाच तर न्यायाधीशापर्यंत लाच देऊ, हुशार वकीलाच्या सहाय्याने निर्दोष सुटू; व पुन्हा समाजामध्ये उजळ माथ्याने मिरवू. नैतिकतेचे बेगड अंगाला चिकटवून पुढारी म्हणूनही प्रसिद्ध होऊ. ही एक धारणा आहे. बहुधा ही धारणा गुंड लोकांत असते.

दुसरी धारणा अशी की, कायद्याविरुद्ध वागणे गुन्हा आहे. आपली मालमत्ता व समाजातील प्रतिष्ठा मोठी आहे. त्यामुळे आपण जरा कायद्याला भिऊन व जपून वागावे. सरकारी अधिकाऱ्याला खूष ठेवून राज्यकर्त्यांच्या पक्षाचा अनुनय करून वागावे. आपल्या मालमत्तेची व प्रतिष्ठेची कातडी बचावण्याकरिता असे वागणेच चांगले. ही दुसरी धारणा असू शकते. बहुधा ही धारणा व्यापारी-धनिक-उद्योगपतींत असते.

तिसरी धारणा अशी की, चोरी करणे महापातक आहे. ते वेदविरुद्ध आहे. या पापाचे वाईट फळ ईश्वर आपल्याला या जन्मात किंवा भावी जन्मात निश्चित देईलच. ही तिसरी धारणा आहे. आणि ही धार्मिकांत असते.

चवथी धारणा अशी की, आपण जगातील कोणत्याही सत्तासंपत्तीच्या अथवा कनक-कांतेच्या मोहात न पडता स्वधर्माचे निष्काम बुद्धीने अनुष्ठान करावे. ईश्वराचा प्रसाद संपादन करावा, भक्ती करून ईश्वराचा सगुण साक्षात्कार करून घ्यावा. गुरुकृपेने ईश्वराचा निर्गुण साक्षात्कार करून घ्यावा व आपण मुक्त व्हावे. ही चवथी धारणा आहे. ही धारणा निवृत्तीमार्गी मुमुक्षु साधकांत असते.

पाचवी धारणा अशी की, आपण मुक्त कृतार्थ झालो तरी समाजाच्या कल्याणाकरिता आपल्याला काही कर्तव्ये आहेत व ती आपण केलीच पाहिजेत. ही पाचवी धारणा विश्वात्मक संतांच्या ठिकाणी असते.

या पाच धारणा उत्तरोत्तर श्रेष्ठ प्रतींच्या धारणा आहेत. समाजाचा बाह्य आकृतिबंध सारखाच असला तरी मानसशास्त्राच्या दृष्टीने त्यात वर्ग पडणे अपरिहार्य आहे.

Scanned by CamScanner

पाचव्या धारणेचा मनुष्य श्रीज्ञानेश्वर महाराज, श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकाराम महाराज यांच्यासारखा संत असतो. चवथ्या धारणेचा मनुष्य मुमुक्षू जिज्ञासू असतो. तिसऱ्या धारणेचा मनुष्य अत्यंत नीतिमान, पापभीरु, परोपकारी असतो.

दुसऱ्या धारणेचा मनुष्य स्वार्थी, मुत्सद्दी, हुशार असतो. पहिल्या धारणेचा मनुष्य स्वत:चा व आपल्या संसर्गाने दुसऱ्याचा नैतिक अध:पात करणारा, कायद्याला तुच्छ लेखणारा, गुंड, हिंसक, दुराचारी असतो. यालाच 'खल' म्हणतात.

या खलाचे मतपरिवर्तन ईश्वरनिष्ठ संत करू शकतात व त्याला धार्मिक, नैतिक, भक्त बनवू शकतात. परिसाच्या संगतीने लोखंडाचे सोने होते. चंदनाच्या संगतीने कडू धूर देखील सुगंधी होतो त्याप्रमाणे संतांच्या संगतीने खल हा सज्जन होतो. समाजाचे योग्य ते परिवर्तन घडवून आणण्याची साधने संताजवळ तीन प्रकारची असतात. (१) चमत्कार (२) सदाचार आणि (३) सद्विचार. जेव्हा ज्यांच्याकरिता ज्या साधनांचा उपयोग करणे योग्य वाटेल तसा ते करतात.

(१) अगदीच दुर्जन खलपुरुष असेल तर त्याच्याकरिता एखादा अद्भुत चमत्कार करून दाखवितात की ज्यामुळे तो एकदम दिपून जाऊन आस्तिक व धार्मिक बनेल. प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांनीच रेड्याच्या पाठीवर केलेले प्रहार आपल्या अंगावर घेतले व दुर्जनांना आश्चर्यचकित करून त्यांच्यात आस्तिकभाव निर्माण केला.

(२) स्वत:च्या सदाचाराचा प्रभाव दुसऱ्यावर टाकून असत्प्रवृत्त लोकांना सत्प्रवृत्त करतात. नारदाने आपल्या शुद्ध आचाराचा व भक्तिभावाचा प्रभाव वाल्ह्याकोळ्यावर टाकला व त्याला वाल्मिकिऋषी बनविला. श्रीएकनाथ महाराजांनी आपल्या सदाचाराने अंगावर थुंकणाऱ्या यवनाला सज्जन बनविला.

(३) काहींना सद्विचारांनी, सदुपदेशाने त्यांच्या मताचे परिवर्तन करून कृतार्थ करतात, श्रीशंकराचार्यांनी दुराग्रही मंडनमिश्रांचे मतपरिवर्तन केले, श्रीतुकाराम महाराजांनी आपल्या सद्विचाराने रामेश्वरभट्टांना भगवद्भक्त बनविले.

सारांश, संत हे अद्भुत चमत्कार, शास्त्रशुद्ध सदाचार, अनुभवनिष्ठ सद्विचार या साधनांनी स्वधर्माचे महत्त्व आणि समाजात स्वधर्माची भावना स्थिर राहण्याकरिता ईश्वराचे अस्तित्व पटवून देतात. कारण, धर्माधर्माचा शास्ता ईश्वर आहे हे जोपर्यंत पटणार नाही, तोपर्यंत समाजात धार्मिक स्थैर्य राहणार नाही. धार्मिक स्थैर्याच्या अभावी नैतिक स्थैर्य राहणार नाही. आणि नैतिक स्थैर्याच्या अभावी राज्यशासन स्थिर राहात नाही. कारण, राजशासन, नीति, धर्म आणि ईश्वर यांच्यात उत्तरोत्तर श्रेष्ठत्व आहे. म्हणून सर्व प्रकारच्या स्थैर्याकरिता, शांततेकरिता ईश्वराचे अस्तित्व मानणे व त्याची भक्ती करणे आवश्यक आहे. ईश्वर हा स्वत:च्या भक्ताला बुद्धियोग

Scanned by CamScanner

देतो. ईश्वरापासूनच भ्रम-प्रमादरहित बुद्धियोग प्राप्त होतो. 'ददामिबुद्धियोगं तम्' असे गीताशास्त्र सांगते.

ईश्वरापासून भ्रष्ट झालेल्या-ईश्वराला न मानणाऱ्या मनुष्याला, समाजाला वा राज्यकर्त्याला कर्तव्याविषयी अनेक भ्रम व अज्ञाने निर्माण होतात, असे श्रीमद्भागवत सांगते.

ईशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः (ए.स्कं. २।३७)

ईश्वरापासून भ्रष्ट झालेला, ईश्वराला न मानणारा मग तो कोणीही असो तो कर्तव्याच्या भ्रमात पडतो. अज्ञानाच्या अंधारात सापडतो. त्याची ध्येय-धोरणे परिणामी चुकतात. त्याची आज असलेली प्रतिष्ठा, कीर्ती, संपत्ती, सत्ता यांची शोकान्तिका होते. कारण, ज्यांच्या हृदयात ईश्वरच नाही त्यांच्या रोमारोमात अनेक अहंकाराची भुते संचारतात. तो स्वतःला,

ईश्वरोहमहं भोगी सिद्धोहं बलवान् सुखी॥ (भ.गी.अ. १६।१४)

आढयोभिजनवानस्मि कोन्योऽस्ति सदृशो मया। (भ.गी.अ. १६।१६)

मी ईश्वर, मी भोगी, मी सर्वांना आज्ञा करणारा, मी सर्वात बलवान, मी सर्व प्रकारे सुखी, मी श्रीमंत, मी कुलीन, माझ्यासारखा जगात कोण आहे? असे तो मानतो. याप्रमाणे त्याच्या अंगात मीपणाच्या भूतांचा संचार होतो व तो मदोन्मत्त, उद्धट, अविनीत होतो. त्याचा परिणाम श्रीभारवी कवीने म्हटल्याप्रमाणे होतो.

विपदन्ता ह्यविनीतसंपदः (किरातार्जुनीय सर्ग २।५१)

वरील दुराभिमानांची संपत्ती ज्याच्याजवळ आहे, त्याचे पर्यवसान अनेक आपत्तीत, दुःखात व अनर्थात होते. राज्यकर्त्यात ईश्वराचे अस्तित्व न मानण्याचा अभिमान असेल तर राष्ट्राची हानी होते. समाजात असेल तर सामाजिक नीतीची हानी होते. कुटुंबात असेल वा एखाद्या व्यक्तीत हा अभिमान असेल तर कुटुंबाच्या व व्यक्तीच्या भावी हिताची हानी होते.

येथे आणखी एक विचार करणे अवश्य आहे की, समाजात सर्व माणसे सज्जन नसतात.

काही माणसे खल, दुष्ट, नास्तिक, कुतार्किक, चोर, जार असणे स्वाभाविकच आहे आणि तसे असतील तर फारसे बिघडत नाही. बिघडलेच तर त्यांचेच व्यक्तिशः

Scanned by CamScanner

बिघडेल. पण अनीतीच्या, अधर्माच्या आणि नास्तिकपणाच्या मर्यादा सर्व थराच्या समाजापर्यंत जेव्हा पोचतात, किंबहुना राज्यकर्त्यांपर्यंत जाऊन भिडतात तेव्हाच समाजाचे व राष्ट्राचे फार मोठे नैतिकदृष्ट्या नुकसान होते. कुटुंबात एखादा मनुष्य कॉलऱ्याची लागण होऊन आजारी असेल व तोही म्हातारा असेल तर फारसे काळजी करण्यासारखे नसते. पण कुटुंबातील सर्वच माणसे बालापासून वृद्धापर्यंत कॉलऱ्याने पछाडलेली व त्याकरिता औषधोपचारही नसलेली असतील तर घरात चिंताजनक, गंभीर परिस्थिती निर्माण होते. त्याप्रमाणे समाजात एखादा गल्ली-बोळातील सामान्य मनुष्य खल, चोर, जार असेल तर फारसे समाजाचे, राष्ट्राचे नुकसान होत नाही. पण सर्व समाजच तसा झाला तर मात्र फार मोठी आपत्ती राष्ट्रावर ओढवली असे जाणावे. अशा स्थितीत ईश्वरनिष्ठ संतांची मांदियाळी सर्व भूतांना भेटणे आवश्यक आहे. म्हणून ही सातवी प्रार्थना आहे.

Scanned by CamScanner

सातवी परिशिष्ट प्रार्थना

अवतरण – 'ईश्वरनिष्ठ संत समाजाला भेटावेत' ही प्रार्थना सर्वतोपरी योग्य असली तरी यात अडचण अशी आहे की, संत समाजाला भेटले पण समाजाने संतांना नाही मानले आणि त्यांचे आचार व विचार बुरसटलेले, मागासलेले, कालबाह्य, निरुपयोगी म्हणून जर त्यांची उपेक्षा केली व टिंगल, निंदा, नालस्ती केली, तर संत भेटून तरी काय उपयोग आहे? याकरिता समाजाला संतांचा संतपणा पटला पाहिजे व ते आवडले पाहिजेत. आता एखाद्या खलाला संत नाहीच आवडले तर त्याचे दुर्दैव!! पण संतांचे ठिकाणी आवडण्याइतकी गुणवत्ता मात्र असते व ती गुणवत्ता कशी असते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रथम दर्शवून ते संत समाजाला आवडावेत, अशी आणखी एक सातव्या प्रार्थनेच्या पोटीच परिशिष्ट स्वरूपात प्रार्थना करतात.

चला कल्पतरूंचें अरव। चेतना चिन्तामणींचें गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषांचे (१७९७)
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु (१७९८)

वरील ओव्या साहित्यातील रूपकालंकाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. उपमानातील दोषयुक्त अंगाची न्यूनता दाखवून उपमेयामध्ये उपमानापेक्षाही अधिक गुणवत्ता दाखविली आहे.

संत हे उद्यानाप्रमाणे आहेत, पण कोणतेही उद्यान साध्या फळ-पुष्पांच्या झाडांचे असते. पण हे कल्पतरूंचे उद्यान आहेत. उद्यान हे स्थिर असते. पण संत हे चालते उद्यान असतात. यावरून संतांची दोन प्रकारची गुणवत्ता प्रगट केली आहे ती अशी- लोक-कल्याणाची काळजी असलेले संत एका घरात, गावात वा प्रांतात मौन धरून स्वस्थ बसत नाहीत, ते संत 'विचरे विश्व होऊनी विश्वामाजी, असे असतात. गंगा जशी आपल्या प्रवाहाने सर्वांचे पाप-ताप दूर करीत व तीरींच्या वृक्षलतांना पोषीत पुढे जाते, त्याप्रमाणे संत समाजापर्यंत जातात. त्यांच्याशी संपर्क साधतात. त्यांची जडमूढता लक्षात घेऊन तात्पुरते त्यांच्या भूमिकेशी समरस होऊन

Scanned by CamScanner

त्यांना सदुपदेश करतात व संत कल्पतरु असल्यामुळे समाजाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष यापैकी ज्या फलांची इच्छा असेल ते फल धर्मयुक्त करून देतात. धर्मयुक्त म्हणण्याचे कारण असे की, धर्म जर सकाम व दांभिक असेल तर तो अधर्मच होतो. अर्थ जर धर्मयुक्त नसेल तर अनर्थच होतो. काम हा धर्माविरुद्ध नसेल तर ते व्यसनच होते. मोक्ष देखील धर्मयुक्त नसेल तर तो स्वैराचारच होतो. म्हणून प्रत्येक पुरुषार्थ शुद्ध धर्मयुक्त करून देतात.

(२) संत हे चिंतामणींचे गाव आहेत. 'चिंतामणी' नावाचे रत्न क्वचित या सृष्टीत असते. पण संत हे अनंत चिंतामणीचे गाव आहेत. पण गाव जसे जड असते तसे हे नसून सचेतन गाव असतात. या दुसऱ्या रूपकाच्या द्वारा देखील संतांची दोन प्रकारची गुणवत्ता दर्शविली आहे ती अशी-

काही जडमूढ माणसे संतांपर्यंत जात नाहीत. कारण, तशी त्यांना बुद्धीच नसते. पण जे धर्मजिज्ञासू, भक्तिजिज्ञासू आणि ब्रह्मजिज्ञासू असतात ते आपल्या जिज्ञासापूर्तीकरिता संतरूपी गावाकडे जातात. त्या गावात त्यांना चांगला आश्रय मिळतो. त्यांचे जन्ममरणाचे श्रम जातात, त्यांच्या गावातील शीतल छायेमुळे त्रिविधताप जातात आणि संत हे चिंतामणीचेच गाव असल्यामुळे सर्व प्रकारची जिज्ञासा पूर्ण होऊन साधक हा पूर्णकाम होतो. संतांच्या गावात वेद हा जागेश्वर असतो म्हणून धर्म कळतो. कृष्ण-विष्णु, हरि-गोविंद या नामांचे सतत कीर्तन चालू असते. म्हणून भक्ती कशी करावी हे कळते आणि आत्मचर्चा विशदपणाने उदंड चालू असते. म्हणून 'ब्रह्म' कसे ते कळते.

(३) संत हे अमृताचे समुद्र असतात. स्वर्गात अमृताची कोठारे आहेत पण समुद्र नाही आणि समुद्र गर्जना करतो, पण बोलत नसतो. पण संत हे अमृताचे बोलते समुद्र असतात. यातही दोन प्रकारची गुणवत्ता व्यक्त झाली आहे. संतांची उपदेशवचने अमृतासारखी गोड व समुद्रासारखी अर्थगंभीर असतात. गोड असल्यामुळे सामान्य जनांना रुचतात व अर्थगंभीर असल्यामुळे विद्वानांना पटतात.

(४) तसेच संत हे चंद्राप्रमाणे असतात, पण कलंकरहित असतात. चंद्राप्रमाणे त्यांचे दर्शन आल्हादकारक व पुण्यजनक असते व ते आपल्या उपदेशामृत किरणांनी साधकाला सुखसमाधानाची शीतलता निर्माण करतात. तसेच ते कलंकरहित असतात. याचा अर्थ त्यांचे चरित्र भ्रम व पाप या कलंकांनी रहित असते. म्हणून त्यांच्या चारित्र्याचा प्रभाव इतरेजनांवर पडतो व लोक त्यांचे शुद्ध चारित्र्य बघून आपोआप नतमस्तक होतात व त्यांच्या आदर्शभूत चरित्राच्या अनुकरणात धन्यता मानतात. त्यांचे धवल चरित्र पृथ्वीतलावर अमर राहते. कविजन त्या कलंकरहित चरित्राचे

Scanned by CamScanner

श्रद्धेने व आवडीने काव्यात ग्रथन करतात.

(५) संत हे सूर्य असतात. पण सूर्य अंतरिक्षमंडळांत असतो. संतरूपी सूर्य भूमंडळावर असतात. सूर्य तापयुक्त असतो व हे तापहीन असतात. यातही संतांची दोन प्रकारची गुणवत्ता प्रकट केली आहे. संत हे जिज्ञासूंना ज्ञानाचा प्रकाश देतात. अज्ञानाचा अंधकार घालवितात पण संत हे तापहीन सूर्य असल्यामुळे त्रिविधतापाची निवृत्ती करून शीतल मोक्षशांती प्राप्त करून देतात. अशा समाजोपयोगी सर्व गुणांनी संपन्न असलेले संत सर्वांना सर्वकाळ सोयरे व्हावेत. जिवलग आप्त वाटावेत. हितकर्ते नातेवाईक वाटावेत. परमश्रद्धेय, परमप्रेमास्पद, परसेव्य गुरू म्हणून आवडावेत. संत हे समाजाला आवडले तरच समाजाचे कल्याण होत असते. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराजांनी ही सातवी परिशिष्ट प्रार्थना केली आहे.

Scanned by CamScanner

आठवी प्रार्थना

अवतरण – आता विश्वकल्याणाकरिता समाजाने करावयाचे साधन आणि समाजाला अपेक्षित असलेले फळ यांची प्रार्थना करतात.

किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनी तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥ १७९९॥

हे विश्वात्मक श्रीगुरुदेवा, तुम्हाला अधिक काय मागावे? आता हेच मागतो की, अखिल त्रैलोक्यातील लोकांनी सर्व सुखाने पूर्ण होऊन आदिपुरुष-जगत्कारण परमात्म्याची भक्ती करावी, असा या ओवींचा सरळ अन्वय आहे. परंतु सामान्यपणे विचार केला असता आदिपुरुष परमात्म्याचे भजन, हे साधन आणि सर्व सुखाने पूर्ण होणे हे फल आहे, असे सिद्ध होते. कारण स्वधर्म, हरिभक्ती, अष्टांगयोग, हठयोग, ब्रह्मज्ञान या सर्वांचे फल, 'सर्वसुख' आहे. आणि सर्वसुख हे सर्व साधनांचे फल म्हणूनच श्रीज्ञानेश्वर महाराजांना अभिप्रेत असलेले ज्ञानेश्वरीत आढळून येते. म्हणून आदिपुरुषाची भक्ती आणि सर्व सुखाने पूर्ण होणे, या दोघांत साधन-फलभाव मानणे उचित आहे.

पण 'सर्व सुखी पूर्ण होऊनी' या वाक्यातील ऊन प्रत्ययान्त कृदन्त अव्ययाने आदिपुरुषाच्या भक्तीचा पूर्वकाल द्योतित केला आहे. त्यामुळे वाक्यार्थ असा होतो की प्रथम सर्व सुखाने पूर्ण होऊन नंतर आदिपुरुषाची भक्ती करावी. जसे 'रामाने प्रथम जेऊन नंतर गावाला जावे' असे एखाद्या घरातील वडील माणसाने वाक्य उच्चारावे तसे किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनी तिहीं लोकीं। भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।' हे वाक्य वाटते. पण वाक्यार्थाची मीमांसा केली जाते तेव्हा पाठ्यक्रमापेक्षा अर्थक्रम महत्त्वाचा मानला जातो. या मीमांसापद्धतीनुसार 'होऊनी' आणि 'भजिजो' असा पाठक्रम असला तरी आदिपुरुषाचे भजन हे साधन आणि सर्व सुखांने पूर्ण होणे हे फल असल्यामुळे 'होऊनी' या कृदन्त अव्ययांच्या अर्थाचे रूपांतर संस्कृत व्याकरणातील बाहुलकानुसार 'होआवयां' या कृदन्त अव्ययांच्या अर्थात करावे, म्हणजे मग वाक्यार्थ असा होतो की,

Scanned by CamScanner

"तिन्ही लोकांतील देव, मनुष्य, उरग या प्राण्यांनी किंवा सात्विक राजस, तामस या तीन प्रकारच्या लोकांनी सर्वसुखाने पूर्ण होण्याकरिता आदिपुरुष-ईश्वराचे अखंड भजन करावे."

ज्ञानेश्वरीत लेखक-पाठकांच्या प्रमादाने पुष्कळ पाठभेद निर्माण झाले आहेत. कदाचित मुळात 'होआवया' असे अव्यय असण्याची शक्यता आहे. पण हा केवळ तर्क आहे. याला आधार कुठे सापडत नाही म्हणून वरीलप्रमाणे उपपत्ति योग्य आहे.

जगाचे आदिकारण परमात्मा आहे. तो परमात्मा आपल्या प्रकृतिरूपी पुरीमध्ये जणू शयन करतो किंवा तो सत्, चित् आणि सुख या तीन स्वरूपांनी पूर्ण आहे. म्हणून त्याला 'पुरुष' म्हणतात.

काही जडवादी दार्शनिक जडापासून जगत् झाले म्हणतात. पण मानवी ज्ञानाची मर्यादा जेथे संपते अशी अगम्य कल्पनातीत जगाची रचना आणि जगातील देश, काल व इतर कार्यकारणभाव, यांच्यातील सुव्यवस्थितपणा या सर्वांचा विचार केला तर, जगाचे कारण जड असेल असे तर्कानेही सिद्ध होत नाही. काही दार्शनिक शून्य हेच जगाचे कारण मानतात. पण शून्य म्हणजे अभाव. हा तर कोणत्याही प्रकारे कोणत्याही कार्याचे कारणच होऊ शकत नाही. म्हणून सर्वज्ञ सर्वशक्तिमान आदिपुरुष परमात्माच जगाचे कारण आहे असेच सिद्ध होते व म्हणूनच तो भजनीय आहे. 'जेथोनि चराचर त्यासी भजे' असे श्रीज्ञानेश्वर महाराज हरिपाठात सांगतात. आदिपुरुषच भजनीय आहे हे विशेषत्वाने सांगण्याचे कारणही विशेष महत्त्वाचेच आहे. आदी आणि पुरुष हे दोन शब्दच इतक्या महत्त्वाच्या अर्थांनी भरले आहेत की, जगाला आदि म्हणजे आरंभक कारण नसेल आणि ते कारणही प्रकृतिविशिष्ट चेतन पुरुष नसेल, तर जगाची सिद्धीच होणार नाही. भले कोणी नास्तिक ईश्वर न मानोत !! पण ईश्वराचे सर्व जगावर अनंत उपकार आहेत. कारण, आदिविज्ञान, आदियंत्र आणि आदिशास्त्र हे तीन आदिपुरुषानेच निर्माण केले आहेत. आदिविज्ञान पंचमहाभूते, मन, बुद्धी व अहंकार हे आहे. आदियंत्र शरीर आहे, आदिशास्त्र वेद आहेत व या तिघांचा प्रणेता आदिपुरुष परमात्मा आहे. या मूलभूत विज्ञान, यंत्र व शास्त्र यावरच हल्लीचे विज्ञान, यंत्रे व शास्त्रे आधारित आहेत. हल्ली विज्ञानाची खूपच प्रगती झाली आहे व यापुढेही कितीतरी पटीने होण्याची शक्यता आहे. पण हल्लीचे विज्ञान ईश्वरनिर्मित विज्ञानावर आधारित आहे. म्हणून विज्ञानाचा खरा आद्यप्रणेता हा आदिपुरुष ईश्वरच आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

विज्ञान दोन प्रकारचे आहे. एक प्राकृतिक आणि दुसरे वैकृतिक. त्यापैकी प्राकृतिक

Scanned by CamScanner

विज्ञान हे मूलकारणस्वरूपाचे आहे आणि वैकृतिक विज्ञान हे कार्यस्वरूपाचे आहे. त्यापैकी प्राकृतिक विज्ञान ईश्वराने निर्माण केले आहे आणि ते आठ प्रकारचे असल्याचे गीतेत म्हटले आहे. ते आठ प्रकार असे –

भूमी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी, अहंकार हे आठ प्रकारचे विज्ञान आहे. या प्राकृतिक विज्ञानावरच हल्लीच्या वैज्ञानिकांचे शोध, बोध व प्रयोग आधारलेले आहेत. हल्लीच्या वैज्ञानिकांनी वरील आठापैकी कोणतेही पदार्थ निर्माण केले नाहीत. पण ईश्वरनिर्मित भूमीतील अनेक खनिज पदार्थ, अनेक धातू यांचा शोध लावला व त्यापासून अनेक प्रकारच्या मालांचे उत्पादन वाढविले आहे. पाणी व अग्नी यांच्या संयोगाने बाष्पशक्ती तयार करण्यात येऊन रस्त्यावर इंजिने धावू लागली व धडधडू लागली. विजेतील अग्नीच्या योगाने कारखाने वाढले. खेडीपाडीसुद्धा विद्युद्दीपाने उजळून निघाली. अणुशक्तीचा उपयोग तर मालाच्या उत्पादनाच्याद्वारा उपकारक व अण्वस्त्रादिकांच्या द्वारा संहारक होत आहे. वायुशक्तीने पंखे फिरवून विमाने आकाशात उड्डाण घेत आहेत. प्रत्येक वैज्ञानिक प्रयोगाला आकाशाचा सामान्य सहयोग तर आहेच. मनुष्याला मन आहे म्हणून वैज्ञानिक शोधाची इच्छा होते. बुद्धी आहे म्हणून कार्यकारणभावांचा अचूक बोध होतो व बोधाने प्रयोग सिद्ध होतो. मनुष्यात अहंकार आहे म्हणून मनुष्यातील कर्तृत्वशक्ती वाढते. सारांश, वैकृतिक-अर्थात कार्यात्मक विज्ञानाला मूलभूत विज्ञानाची अथवा प्राकृतिक विज्ञानाची गरज आहे. भूमी आदि आठ प्रकारचे विज्ञान नसते तर यंत्र, तंत्र व उपकरणे कशी निर्माण झाली असती ? हा प्रश्न अनुत्तरीतच राहील. मूळ प्राकृतिक विज्ञानाचा प्रणेता आदिपुरुष ईश्वरच आहे. ईश्वरकृत भूम्यादी पदार्थांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनी 'येर प्रपंच हे विज्ञान' असे म्हटले आहे.

तसेच मुळात ईश्वराने पंचमहाभूतांच्या सुव्यवस्थित मिश्रणापासून व अन्नाचा परिणाम असलेल्या स्त्री-पुरुषांच्या रज-वीर्याच्या संयोगापासून अवयवांची योजनाबद्ध ठेवण असलेले हे शरीरच एक महान यंत्र निर्माण केले आहे.

ऐसेनि शरीराकारीं। यंत्रीं भूतें अवधारी।
वाऊनी हालवी दोरी। प्राचीनाची॥ (अ. १८।१३२८)

या शरीररूपी यंत्रावर माणसे जेव्हा अहंकाराच्या द्वारा आरूढ होतात व ईश्वर जेव्हा या यंत्राचा संचालक होऊन कर्मसूत्राची दोरी हालवू लागतो तेव्हा हे शरीररूपी यंत्र बाहेरचे भोग भोगू शकते व अनेक प्रकारची यंत्र-तंत्रे निर्मू शकते. सारांश,

Scanned by CamScanner

ईश्वरनिर्मित शरीरयंत्रावरच इतर यंत्रे आधारित आहेत. तसेच ईश्वरकृत विज्ञानावरच प्राचीन व अर्वाचीन शास्त्रे आधारित आहेत. सांख्यांचा चोवीस तत्त्वांचा शोध, नैय्यायिकांचा सोळा पदार्थांचा शोध व वैशेषिकांचा सात पदार्थांचा शोध हे सर्व ईश्वरसृष्ट विज्ञानावरच आधारित आहेत. आदिपुरुष हेच जगाचे त्रैकालिक सत्य तत्त्व आहे. म्हणून वेदांतशास्त्र प्रवृत्त झाले आहे. हा आदिपुरुषच जीवाने केलेल्या शुभाशुभ कर्माची फले देतो. म्हणून धर्मशास्त्र आहे. आदिपुरुषाने मनुष्याला वाणी दिली म्हणून व्याकरणशास्त्र निर्माण झाले आहे. आदिपुरुषाने अनेक वृक्ष-लतादि वनस्पती, लोह, ताम्र, सुवर्ण, शुक्ति, मोती, गंधक, पारा इत्यादी रस-धातु निर्माण केले म्हणून आयुर्वेदशास्त्र आहे. उदाहरणार्थ- ईश्वराने गुळवेल निर्माण केला म्हणून वैद्याला गुळवेलसत्त्व निर्माण करता आले. ईश्वराने सोने, चांदी, धान्य इत्यादी मूल्यवान पदार्थ निर्माण केले म्हणून अर्थशास्त्राची उभारणी झाली. भूमी आहे म्हणून भूमिती, आकाश, ग्रह, नक्षत्र, तारका, सूर्य, चंद्र ही ग्रहमालिका ईश्वराने केली म्हणून खगोलशास्त्र निर्माण झाले. पृथ्वी, नद्या, समुद्र, पर्वत अनेक प्रदेश निर्माण केले म्हणून भूगोलशास्त्र निर्माण झाले आहे.

सारांश, मानवनिर्मित विज्ञान, यंत्रे व शास्त्रे आदिपुरुषाने निर्माण केलेल्या भूमी आदि प्राकृतिक विज्ञान, शरीररूपी यंत्र आणि वेद यावर आधारित आहेत. म्हणून श्री संतवर्य तुकाराम महाराज म्हणतात-

विठ्ठल आमुचें जीवन। आगमानिगमाचें स्थान।

सर्व आगमानिगमांचा आधार आदिपुरुषच आहे. शेवटी जीव हा सुद्धा आदिपुरुषाचाच एक अंश आहे. देव नाही म्हणणाऱ्याच्या जीवात देखील जी थोडी शक्ती व थोडे ज्ञान आहे तेही ईश्वराचेच आहे. जसे ग्रामीण भागातील सरपंचाच्या हातातही थोडी सत्ता असते व तो दारू पिणारा व निरक्षर असला तरी तो आपल्या गावापुरती अरेरावी करतोच. पण खरी राजसत्ता केंद्रसरकारचीच असते. म्हणून सरपंचाला देखील अभिमान न बाळगता केंद्रीय सत्ता जशी मानावीच लागते, त्याप्रमाणे प्रत्येक जीवाला आदिपुरुष हा भजनीय आहे.

त्या परमात्म्याची दोन प्रकारांनी भक्ती करता येते. एक परमात्म्याच्या सगुण स्वरूपाची अत्यंत प्रेमयुक्त अंत:करणाने व अनन्यतेने नामसंकीर्तनादि भक्ती आणि दुसरी गुरुकृपेने परमात्माच जीवात्मा आहे अशी अभेदस्वरूप ज्ञानलक्षण भक्ती होय. या दोन प्रकारच्या भक्तियोगांनी मनुष्याला जगातील सर्व कर्मजन्य सुखे ज्यांच्यात अंतर्भूत आहेत, अशा मोक्षसुखाने पूर्ण होता येते. असे पूर्ण व नित्य-निरतिशय

Scanned by CamScanner

सर्वसुख जगात कोणाला अपेक्षित नाही ? अर्थात त्रैलोक्यातील सर्वांनाच अपेक्षित आहे व या सुखाच्या प्राप्तीचे प्रेमलक्षण व ज्ञानलक्षण भक्ती ही दोन साधने आहेत. म्हणून त्रैलोक्यातील सर्व लोकांनी आदिपुरुषाची भक्ती करावी आणि सर्व सुखाने पूर्ण व्हावे. ज्ञानदेवांची ही आठवी प्रार्थना देखील सुयोग्यच आहे.

'**जो जे वांछील तों तें लाहो**' ही प्रार्थना बहुधा भोग्यसुख किंवा वैषयिक सुख यासंबंधी आहे आणि **किंबहुना सर्वसुखीं पूर्ण होऊनी तिही लोकीं।** ही प्रार्थना सर्व वैषयिक सुखांचा ज्याच्यात अंतर्भाव आहे अशा केवळ मोक्षसुखासंबंधीच आहे. म्हणून पुनरुक्ती नाही व मोक्षाचे असाधारण महत्त्वही या ओवींत ध्वनीत केले आहे. आता या ओवीचे दुसरे विवरण असे की-

वरील अर्थ 'होऊनी' या अव्ययाकरिता 'होआवयां' या अव्ययाचा अर्थ घेऊन भक्ती व सर्वसुखप्राप्ती यांच्यात साधन-फलभाव दर्शवून केला आहे.

पण '**सिद्धस्य गतिश्चिन्तनीया**' या न्यायाने 'होऊनी' हाच पाठ घेऊन देखील दुसरा एक महत्त्वाचा अर्थ होऊ शकतो. तो असा-

जगातील सर्व सुखांनी पूर्ण होऊनदेखील आदिपुरुषाची अखंड भक्ती करावी. इहजन्मातील वा पूर्वजन्मातील स्वधर्माचरणाने वर्तमानकाळात सर्व प्रकारचे भोग, विलास, स्त्री, पुत्र, धन, धान्य, बंगले, राजवाडे, राजसत्ता, विद्वत्ता या सर्व सुखांनी मनुष्य हा पूर्ण होऊन देखील-पूर्ण झाला; तरीसुद्धा त्याने आदिपुरुषाची भक्ती अखंड करावी. सत्ता-संपत्तीच्या मदात ईश्वराला विसरून मदोन्मत्त होऊ नये. पूर्वीचे रुक्मांगद, अंबरीष, बिभीषण, युधिष्ठिर इत्यादी राजे किंवा आधुनिक गो-ब्राह्मणप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज इत्यादी राजे सत्ता-संपत्तींनी पूर्ण होऊनही भगवद्भक्ती करीत होते. जे सत्ता-संपत्तींनी पूर्ण होऊन उन्मत्त होतात व देवाची भक्ती करीत नाहीत असे रावण, कंस, वेन यासारखे दुष्ट राजे रसातळाला जातात. बहुतेक सत्ता-संपत्तीच्या ऐश्वर्याने मनुष्याच्या विचाराचा तोल सुटण्याची शक्यता अधिकच असते. संपत्ती, विद्वत्ता, राजसत्ता किंवा एखाद्या महान् कार्याचे कर्तृत्व जितके अधिक, तितक्याच प्रमाणात त्याच्याविषयी अभिमानही निर्माण होत असतो.

सर्वात जगदुत्पत्तीचे कर्तृत्व फार मोठे असल्यामुळे ब्रह्मदेवाला त्या संबंधी अभिमान निर्माण होऊन तो महामोहात बुडेल, म्हणून श्री भगवंतांनी ज्ञानासह भक्ती सांगितली, असे श्री एकनाथमहाराज म्हणतात.

पावोनि चतुःश्लोकीचें ज्ञान। ब्रह्मा झाला ज्ञानसंपन्न।
करितां सृष्टीचें सर्जन। तिळभरी अभिमान बाधीना॥ (च.भा. २८)

Scanned by CamScanner

या ब्रह्मदेवाच्या उदाहरणातील एकच रहस्य महत्त्वाचे आहे ते असे की, मनुष्यात प्रतिसृष्टी निर्माण करण्याचे कर्तृत्व जरी असले आणि सार्वभौमसत्ता त्याच्या हातात असली तरी, त्याला अभिमान व मोहममता जाण्याकरिता आदिपुरुषाची भक्ती करणे आवश्यक आहे.

भोगप्रधान जीवनातदेखील देवाची आठवण ठेवणे, देवाचे नामस्मरण करणे, देवाचे भक्त जे संत आहेत, त्यांच्यावर श्रद्धा ठेवणे व त्यांच्या ग्रंथांचे पठण करणे आवश्यक आहे. तसेच सर्वाभूती भगवद्भाव ठेवून दीन, दुर्बळ, रोगी, दरिद्री, मूर्ख, अनाश्रित, लुळे, खुळे, पांगळे, आंधळे, दलित व आदिवासी यांची यथाशक्य, यथायोग्य व यथाशास्त्र पद्धतीने श्रीमंतांनी व सत्ताधारी लोकांनी काया-वाचा-मन-धनांनी सेवा करावी.

प्रत्येत व्यक्ती समाजाचा देणेदार लागतोच; कारण प्रत्येक व्यक्तीच्या जीवनविकासाकरिता माता, पिता, गुरु, राज्यकर्ते, शेतकरी, व्यापारी, कारखानदार, मजूर यांचे श्रम प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे कारणी लागलेले असतात. तसेच जीवनविकासाकरिता गुरू, ब्राह्मण, गोत्रज, अतिथी, दीन, दुबळे यांच्या आशीर्वादाचीही गरज असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या संपत्तीचा काही वाटा समाजसेवेकरिता द्यावा. समाजसेवारूपी यज्ञात स्वधर्मार्जित संपत्तीचे हवन करावे असे श्रीज्ञानेश्वर महाराज सांगतात.

हें संपत्तिजात आघवें। हवनद्रव्य मानावें।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुषीं॥ (अ. ३।१३०)

सारांश, सर्व प्रकारच्या संपत्तिसुखांनी पूर्ण व्हावे. पण भोगासक्त व भोगोन्मुक्त न होता ईश्वरापासून मुंगीपर्यंत कोणाशीही वैर न करता आपल्या संपत्तीच्या द्वारा सर्वांची सेवा करणे ही देखील आदिपुरुषाची व्यापक भक्ती आहे.

किंवा, सर्वसुखी म्हणजे मोक्षसुखाने पूर्ण होऊन देखील त्या मुक्ताने प्रारब्ध अविशिष्ट असेपर्यंत उर्वरित जीवन्मुक्तीत सगुणभक्तीचे आणखी एक विलक्षण सुख प्राप्त होण्याकरिता किंवा अज्ञानी लोकांना भक्तीचा मार्ग दाखविण्याकरिता आदिपुरुषाची अखंड भक्ती करावी. काही ज्ञानी सगुण भक्तीच्या प्रेमाने मुक्तीनंतरही 'आतां दिवस चारी खेळी मेळी' या मौजेने भक्ती करतात असे ज्ञानेश्वर महाराज प्रतिपादतात.

याहीवरी पार्था। माझीया भजनीं आस्था॥ (अ. १२।२०)
मीची होऊनी पांडवा। करिती माझी सेवा॥ (अ. ९।१९६)

Scanned by CamScanner

ज्ञानोत्तर भक्ती आणखी एका कारणाने घडते. ते कारण म्हणजे लोकसंग्रह होय. तेही ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

अगा प्राप्तार्थ जरी जाहले। निष्कामता पावले।
तयांहि कर्तव्य असें उरलें। लोकांलागीं॥ (अ. ३।१५५)

येरां नाम मी ठेवी। मग भजती वोज बरवी।
न भजतयां दावी। योगिया जो॥ (अ. १२।१८७)

सारांश, वरील ओवीचे तीन अर्थ संभवतात ते असे –

(१) सत्ता संपत्तीच्या सुखांनी पूर्ण होऊनही अंगी निरभिमानपणा व सद्विचार स्थिर राहण्याकरिता श्रीमंतांनी व सत्ताधाऱ्यांनी आदिपुरुषांची भक्ती करावी.

(२) सर्वसुख अशा मोक्षसुखाने पूर्ण होऊन देखील सगुणभक्तीच्या एका आगळ्या सुखाकरिता आदिपुरुषाची भक्ती करावी.

(३) सर्वसुखस्वरूप मोक्षाची पूर्णता प्राप्त होऊन देखील अज्ञानी व दुराचरणी लोकांना ज्ञानी व सदाचरणी बनविण्याकरिता मुक्ताने आदिपुरुषांची भक्ती करावी.

या ओवींतून निघणारे हे तीन अर्थ सप्रमाण आणि वैयक्तिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती शांत राहण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

Scanned by CamScanner

नववी प्रार्थना

आणि ग्रंथोपजीविये। विशेषें लोकीं इयें।
दृष्टादृष्टविजयें। होआवें जी॥ (१८००)

अवतरण : खळाचे लक्षण कोणते? सत्कर्म म्हणजे काय? दुरित कशाला म्हणावे? स्वधर्माचे स्वरूप कोणते? परस्पर भूतमात्राविषयीचे मित्रत्व कोणत्या प्रकारचे असावे? त्या मित्रत्वाचे शास्त्रीय स्वरूप कोणते? एकमेकांना हॉटेलमध्ये नेऊन चहा पाजविणे, दारू पाजविणे, सिनेमा दाखविणे, त्याच्या अन्यायी व्यापाराला, उद्योग-धंद्याला व निवडणूक प्रचाराला आर्थिक व शारीरिक मदत करणे असे मित्रत्व असावे? का यापेक्षा शास्त्रशुद्ध मित्रत्व वेगळे आहे? ईश्वराचे लक्षण, ईश्वरनिष्ठ संतांचे लक्षण व त्यांच्या कार्याचे महत्त्व ते काय? सर्वसुख म्हणजे कोणते? आदिपुरुषाची भक्ती व तिची महती कशी? या सर्व प्रश्नांची उत्तरे वेदादी ग्रंथांत सापडतात म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज नववी प्रार्थना करतात.

आणि ग्रंथोपजीवियें। विशेषें लोकीं इयें।

सर्वांनी सर्वसुखपूर्ण होऊन आदिपुरुषाचे अखंड भजन करावे आणि या मृत्युलोकांतील विशेषत: मनुष्यांनी स्वत:च्या हिताकरिता ग्रंथांना उपजीव्य म्हणजे प्रमाणभूत मानावे. ओवीतील ग्रंथ हा शब्द श्रीज्ञानेश्वर महाराजकृत 'ज्ञानेश्वरी' याच ग्रंथाचा बोधक आहे असे नाही. कारण तो सामान्य वाचक शब्द आहे. 'म्हणोनी हा काव्यरावो। ग्रंथ गुरुवतीचा ठावो' असे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी महाभारतालाही ग्रंथ म्हटले आहे. आणखीही काही प्रमाणभूत ग्रंथांचा ज्ञानेश्वरीत निर्देश केला आहे.

वेद, उपनिषदे, उपनिषदानुसारी सर्व अध्यात्मशास्त्रे, सांख्यशास्त्र, योगशास्त्र, श्रीमद्भागवत, श्रीमद्भगवद्गीता, महाभारत, रामायण, वेदानुसारी स्मृती, अठरा पुराणे, श्रीमदाद्य शंकराचार्यांचे भाष्य या सर्व ग्रंथांना श्रीज्ञानेश्वरमहाराज उपजीव्य म्हणजे प्रमाण मानतात. म्हणून सर्वांनी या ग्रंथांना उपजीव्य मानून सर्व आचार-विचारांचे निर्णय घेतले पाहिजेत. अतींद्रिय विषयात प्रमाण व तर्क दुर्बल आहेत. म्हणून ग्रंथांना मानण्यात यावे. कारण मनुष्याकरिता शास्त्रे आहेत. याकरिता विशेषे करून

Scanned by CamScanner

मनुष्यांनी अहितापासून परावृत्त व हिताकडे प्रवृत्त होण्याकरिता श्रुतिस्मृतीचे अर्थ जाणून त्याप्रमाणे ज्यांचा आचार व अनुभव आहे अशा आचार्यांच्या संगतीत शिष्यभावाने राहून संप्रदायशुद्ध पद्धतीने ग्रंथांचे श्रवण, मनन, पठण, अर्थज्ञान संपादन करावे.

'पोथीनिष्ठा ही प्रतिगामी आहे.' अशी टीकेची झोड उडविणारे देखील मनुष्यकृत घटनेवर, कायद्यावर आणि राज्यकर्त्यांच्या नेतृत्वावर आणि वक्तव्यावर विश्वास ठेवतात व त्यांचा 'उदो उदो' करतातच. अर्थात हा विश्वास तरी परिणामी आंधळा नाही कशावरून ? या प्रश्नांचे उत्तर दूरदर्शीपणाने देता येणार नाही.

सारांश, संतमान्य अशा वेदादी ग्रंथावर व संतकृत ग्रंथावर आणि श्रीज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी आदी ग्रंथावर विश्वास ठेवणे योग्य आहे. त्याशिवाय मनुष्याचे स्थिर हित होणे शक्य नाही. म्हणून ही नववी प्रार्थना आहे.

Scanned by CamScanner

दहावी प्रार्थना

अवतरण : ग्रंथांना प्रमाण मानणाऱ्यांचे सर्वतोपरी हित व्हावे या करिताच ही शेवटची दहावी प्रार्थना करतात.

दृष्टादृष्टविजयें। होआवें जी॥

या मृत्युलोकातील ज्या मनुष्यांनी विशेषेकरून ग्रंथांना उपजीव्यप्रमाणभूत मानून त्यात सांगितल्याप्रमाणे आपले आचार-विचार निश्चित केले आहेत आणि दैवी संपत्ती, कर्म, भक्ती, योग, ज्ञान, वैराग्य, ही साधने ज्यांनी यथाशास्त्र अनुष्ठिली आहेत, त्यांचा दृष्ट अशा ऐहिक सुखावर विजय असावा आणि अदृष्ट अशा पारलौकिक सुखावर विजय असावा अथवा त्यांना दृष्ट म्हणजे प्रत्यक्षप्रमाणाचा विषय होणाऱ्या, परमात्म्याच्या सगुणविग्रहाचा साक्षात्कार व्हावा आणि अदृष्ट म्हणजे अतींद्रिय असलेल्या निर्गुण परमात्म्याचा आत्मत्वाने साक्षात्कार व्हावा. 'विजय' शब्द घालण्याचे कारण असे की,

'श्रेयांसि बहुविघ्नानि' चांगले ते अनेक विघ्नांनी संपन्न असते अशी म्हण आहे. चांगल्या कार्यात काम-क्रोधादी अन्तःशत्रु आहेत आणि खल-दुर्जनादी बाह्य शत्रू आहेत. हे सर्व शत्रू मनुष्याचा अभ्युदय व विश्रेयस् यांना विघ्ने करतात. याकरिता ग्रंथाच्या, संतांच्या व स्वधर्माच्या साह्याने या विघ्नांचा नाश करून मनुष्याने दृष्टादृष्ट फलांच्या प्राप्तीचा विजय मिळवावा व त्या विजयाने असावे. सारांश, विश्वातील सर्व मनुष्यांनी अभ्युदय-निश्रयेसांच्या उत्कर्षाने असावे. कोणीही दृष्टादृष्ट फलांच्या बाबतीत विघ्नांनी पराभूत होऊन हीन, दीन, दुर्बल, अशांत, असमाधानी नसावे. जगातील कोणीही दृष्टादृष्ट फलापासून वंचित राहू नये. सर्वांना सर्व प्रकारचा उत्कर्ष प्राप्त व्हावा अशी ही दहावी प्रार्थना आहे. या प्रार्थनेने तर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सर्व प्रार्थनामंदिरांवर सुवर्णकलशच चढविला आहे.

Scanned by CamScanner

विश्वात्मक श्रीगुरुदेवांचे वरदान

अवतरण : अशी विश्वकल्याणासाठी वराची प्रार्थना केल्यानंतर कोणते श्रीगुरू प्रसन्न होणार नाहीत? विशेषत: श्रीगुरूनिवृत्तीनाथ हे आधीच कृपाळू, त्यावर श्रीगहिनीनाथांनी "कलिग्रस्त जीवांना दु:खातून मुक्त करण्याकरिता सर्वप्रकारे वेगाने धावा कर" अशी आज्ञा केलेली होती, आणि श्रीज्ञानेश्वर महाराज हे तर श्रीगुरूचे एकुलते एक गुरुनिष्ठ शिष्य होते. आणि नि:स्वार्थीपणाने विश्वकल्याणाची काळजी करणारे संत होते. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांच्या या दश प्रार्थनेला अनुसरून श्रीगुरू हे वरदान देण्यास प्रवृत्त झाले.

येथ म्हणे विश्वेशरावो। हा होईल दानपसावो।
येणें वरें ज्ञानदेवो। सुखीया झाला॥ अ. १८ ओ. १८०१)

विश्वाचे नियामक असलेले जे इंद्रादिक देव, त्यांचेही राजे असलेले, ज्यांच्या सार्वभौम ईश्वरी सत्तेने ब्रह्मदेव, इंद्र, वायू, सूर्य, अग्नी, मृत्यू आपआपले विश्वस्थितीचे कार्य करतात, असे सर्वसमर्थ श्रीगुरूनिवृत्तीनाथ या प्रार्थनेविषयी असे म्हणाले की, ज्ञानदेवा! तुझ्या प्रार्थनेप्रमाणे हा वरदानाचा प्रसाद होईल. आम्ही तुझ्यावर वरदानाचा अनुग्रह करू. असे म्हटल्याबरोबर या वरदानाने ज्ञानदेव सुखी झाले– संतुष्ट झाले. कारण ज्ञानदेव हे विश्वाच्या कल्याणात सुख मानणारे होते. या पसायदानात जे जे मागितले आहे, त्यायोगाने विश्वाचे कल्याण होणार आहे, अशी त्यांची ठाम धारणा होती. आणि श्रीगुरूच्या समर्थ अशा वरप्रसादाने सर्व घडणार आहे, या परम विश्वासाने ते सुखी झाले.

श्रीगुरुनिवृत्तिनाथांनी श्रीज्ञानदेवांच्या पदरात टाकलेले हे दान भूमी, पैसा, सोने, वस्त्र यापैकी नश्वर वस्तूंचे नसून ही दाने देण्याची प्रवृत्ती ज्याच्यामुळे समाजात निर्माण होते असे हे सार्वभौम, सार्वकालिक व शाश्वत असे हे दान आहे. त्यामुळे या दश दानांनी ज्ञानदेव सुखी झाले.

Scanned by CamScanner

समारोप

कोणत्याही क्षेत्रात स्वैराचार हा केव्हाही चांगला नाही. '**कामात्मता न प्रशस्ता**' असे श्रीमनु म्हणतात. स्वैराचाराने वागणे ही पशुपक्ष्यांच्या देहातील स्वाभाविक प्रकृती आहे, पण तीच माणसाच्या देहातील अस्वाभाविक विकृती आहे. पण त्याबरोबर हेही खरेच आहे की, सर्वच माणसे जन्मत:च शुक्राचार्यांसारखी प्रपंचाविषयी विरक्त, मारुतीसारखी ब्रह्मचारी, श्रीतुकारामांसारखी महासाधू असू शकतील असे नाही. पण प्रत्येक माणसाला स्वधर्म, संत, वेदादी ग्रंथ, आदिपुरुषांची भक्ती या साधनांनी स्वैराचाराची विकृती घालवून संत होता येते. व ते क्रमाक्रमाने होता येते एवढे मात्र निश्चित.

म्हणून माणसाने पशू व संत ही जी दोन विरुद्ध टोके आहेत व या दोघांत जे स्वैराचाराचे व निग्रहाचे जे दक्षिणोत्तर ध्रुवाइतके अंतर आहे ते स्वकल्याणाच्या संदर्भात विचारात घेणे आवश्यक आहे. स्वैराचाराने पशुप्रकृतीकडे अथवा निग्रहाने संतप्रवृत्तीकडे आपले देह, इंद्रिये, मन, बुद्धी हे सर्व वळविण्याचे स्वातंत्र्य निसर्गनिच मनुष्याला दिले आहे. पण त्या स्वातंत्र्याला अविचाराने ढकलीत नेले तर तो मनुष्य साहजिकच स्वैराचारात्मक पशुप्रकृतीकडे वळतो आणि जर त्या स्वातंत्र्याला सद्विचाराने माता जशी बाळाचा हात धरून त्याला चालविते त्याप्रमाणे चालविले तर मनुष्य हा संतप्रवृत्तीकडे वळू शकतो.

पशूपेक्षा मानवाला कोणतेही कार्य करण्याचे स्वातंत्र्य अधिक आहे. पण ते अविचारासह असेल तर माकडाच्या हातात कोलीत दिल्यासारखे अनर्थास कारण होते. म्हणून मानवी स्वातंत्र्य हे अनिर्बंध असता उपयोगाचे नाही. त्याला सद्विचाराचे बंधन असावेच लागते. मनुष्य हा पशुप्रकृतीचा होऊ नये, याकरिताच श्रीज्ञानदेवांनी '**खळांची व्यंकटी सांडो**' आणि '**दुरितांचे तिमिर जावो**' या दोन प्रार्थना केल्या आहेत आणि संतप्रकृतीचा व्हावा याकरिता '**तया सत्कर्मीं रति वाढो, विश्व स्वधर्मसूर्यें पाहो**' '**ते सर्वांहि सदा सज्जन सोयरे होतु**' '**भजिजो आदिपुरुखीं अखंडित**' आणि '**ग्रंथोपजीवियें**' या प्रार्थना केल्या आहेत. आणि

Scanned by CamScanner

मनुष्यजीवनाची सफलता व्हावी याकरिता **'जो जे वांछील तो तें लाहो'**। **'दृष्टादृष्ट विजयें। होआवें जी'** या प्रार्थना केल्या आहेत.

सारांश, माणसाने स्वत:ला स्वैराचाराने पशुवत न बनविता सत्कर्म, स्वधर्म, ईश्वरनिष्ठ संतांचा उपदेश, ईश्वरभक्ती या साधनांनी क्रमाक्रमाने प्रथम मानव, नंतर संत आणि देव बनवावे. हीच खरी मानव जातीची प्रगती व उत्क्रांती आहे. श्रीज्ञानदेवांच्या मते प्रपंच असो वा परमार्थ असो, हे दोन्ही विषय चांगल्या प्रकारे साध्य होण्याकरिता जशी योग्य साधने लागतात, तसा योग्य अधिकारही असावा लागतो. अनधिकाऱ्याने व अयोग्य साधनाने केलेला प्रपंच हा श्रीसमर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे 'नेटका' होऊ शकत नाही, किंवा श्रीज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे त्याचे 'ऐहिक धड' राहात नाही.

प्रपंच नेटका असणे म्हणजे बंगला, पैसा, सुंदर स्त्री, घरातील टापटीप, विलासी वस्तूंचा संग्रह, मुले सुशिक्षित, मोठ्या हुद्द्यावर नोकरीला असणे किंवा कारखाने, शेती, लोकमान-प्रतिष्ठा असणे एवढाच त्याचा अर्थ नाही. हे सर्व असूनही मनुष्याचे मन दुष्ट, अनीतिमान, अधार्मिक, नास्तिक असेल तर अशा भरलेल्या प्रपंचाचीही शोकांतिका होते.

म्हणून आमरण व्यंकटी-दुष्टपणा न सोडणारा व दुरिताच्या-पापाच्या अंधारात असलेला 'खल' परमार्थ तर दूरच राहो पण नेटका प्रपंच किंवा धड प्रपंचही करण्याचा अधिकारी असू शकत नाही. कारण, तो पुढच्या जन्मात दु:खे तर भोगीलच पण वर्तमान जन्मात देखील व्यंकटीमुळे व दुरितामुळे अनेक आपत्ती अंगावर ओढवून घेईल व भरलेल्या घराची वाताहत करील. आता ज्याला देशाचा प्रपंच नेटका करावयाचा आहे, राष्ट्रविकास साधावयाचा आहे, ज्याला देशावर राज्य करावयाचे आहे, तो देखील व्यंकटी न सोडणारा व दुरिताच्या अंधारात असेल तर स्वत:सह देशावर अनेक आपत्ती ओढवून घेईल.

यद्यपि वैयक्तिक वा कौटुंबिक प्रपंच हा सुख-समाधानाने जगण्याच्या स्वरूपाचे असतात व राष्ट्राचा प्रपंच औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, विकासाच्या स्वरूपाचे असतात. अर्थात दोन्ही प्रपंचाचे स्वरूप सामान्यत: व्यावहारिकच असते. तरीपण या दोन्ही प्रकारच्या प्रपंचाला नेटकेपणा येण्याकरिता व ऐहिक व्यवहार धड राहण्याकरिता केवळ व्यावहारिक प्रयत्नच उपयोगी पडतो असे नाही, तर त्या प्रयत्नाच्या पाठीमागे स्वधर्मशक्ती व ईश्वरशक्ती असावी लागते. अर्जुनाला प्रबल

Scanned by CamScanner

अशा दुर्योधनाच्या पक्षाचा पराभव जो करता आला तो स्वधर्मशक्ती आणि ईश्वरशक्ती यामुळेच होय. युद्ध हा एक व्यावहारिक प्रयत्न होता.

अर्थात, कौटुंबिक व्यवहार चालविणारी व्यक्ती, गावचा-देशाचा कारभार पाहणारा पुढारी; राजसत्ता चालविणारा नेता हा स्वधर्मनिष्ठ, ईश्वरनिष्ठ, संतांचा उपदेश ऐकणारा, आदिपुरुषाचा भक्त आणि वेदादी ग्रंथांना उपजीव्य-प्रमाणभूत मानणारा असेल तर त्यांचे ते कुटुंब, ते गाव, ते राज्य दृष्टादृष्ट भोगाविषयी विजयी होऊ शकते.

सारांश, व्यावहारिक फलाकरिता देखील धर्म, संत, ईश्वर, आणि ग्रंथ यांची आवश्यकता आहे. मग जे निवृत्तिमार्गी साधू आहेत, जे नश्वर अशी राजसत्ता व संपत्ती मिळविण्याच्या फंदात पडत नाहीत, ज्यांना केवळ ईश्वराचा सगुण-निर्गुण साक्षात्कार अपेक्षित असतो, ज्यांना भक्त व मुक्त होऊन कृतार्थ व्हावयाचे असते, त्यांच्याकरिता धर्मादिकांची आवश्यकता आहे हे निराळे सांगण्याची गरज नाही.

देशातील माणसांची गरिबी हटविण्याकरिता वैज्ञानिक किंवा आर्थिक विकास होणे ही जितकी व्यवहारदृष्टीने महत्त्वाची गरज आहे, तितकीच किंबहुना त्यापेक्षाही अधिक व्यक्ती, समाज व राज्यकर्ते यांच्यातील अनीती हटविण्याकरिता काही योजना असणे महत्त्वाची गरज आहे, व त्या योजना या पसायदानात आहेत. उलट असेही म्हणता येईल की, नीतिमत्ता असेल तर गरिबी ही सुद्धा भूषण ठरते.

संतांची चरित्रे पाहिली तर त्यांची गरीबी पृथ्वीमोलाची व गंगेसारखी पवित्र झाली आहे. दरिद्री अवस्थेत हरिभक्ती करून मजुरी करणारे संत चोखोबा, रस्त्यावर सोने पडले तरी न उचलणारे बंका महार व श्रीमंत शिवाजी महाराजांनी आपण होऊन सोन्याच्या मोहोरा पाठवून दिल्या तरी ' तुका म्हणे धन। आम्हा गोमांसासमान। ' असे म्हणणारे महासाधू तुकाराम महाराज यांच्या आत्यंतिक नैतिकतेने धार्मिकतेने व हरिभक्तीने गरिबीला फार मोठी शोभा प्राप्त झाली आहे. ही नैतिक, धार्मिक मूल्ये आजसुद्धा जतन करण्यासारखी आहेत.

पैसा व राजसत्ता आणि वेगवान ऐषआरामी वाहने नसतानाही एक छाटी नेसून व एक छाटी अंगावर टाकून भारतभर प्रवास करून श्रुतियुक्तियुक्त प्रभावी वाणीने दुर्मतांचे खंडन करणारे त्यागी धर्मप्रचारक, श्री आद्य शंकराचार्य, कवी, साहित्यिक, धर्मात्मा, योगी, हरिभक्त अशा सर्वांगांनी पूर्ण व विश्वकल्याणाची नि:स्वार्थ काळजी करणारे श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज, सरकारी पैशाने नव्हे, केवळ मताकिरता नव्हे आणि

Scanned by CamScanner

लोकप्रियतेकरताही नव्हे, तर स्वत:च्या घरचे श्राद्धाकरिता तयार केलेले अन्न सर्वाभूती भगवद्भक्ताच्या उदात्त व व्यापक श्रद्धेने अंत्यजांना देणारे, संसाराला बाह्यरूप करणारे, प्रचंड ग्रंथसंपत्ती लिहिणारे श्रीएकनाथमहाराज व स्वत:चे मांस देऊन पक्ष्याला वाचविणारा राजा शिबि, अध्यात्मप्रेमी जनक, प्रभुरामचंद्रासारखा प्रजाराधनतत्पर राजा, लक्ष्मण-भरत यासारखे बंधू, सीता-सावित्रीसारखी पतिव्रता, अशी नरनारीरत्ने आजसुद्धा आदर्शभूत नाहीत काय? असा आदर्शभूत मानवसमाज निर्माण करण्याकरिता हे ज्ञानदेवांचे पसायदान आहे.

ज्ञानदेवांनी या पसायदानात मांडलेली समाजोन्नतीची व राज्योन्नतीची कल्पना भव्य व उदात्त तर आहेच, पण केवळ आर्थिक व विज्ञानवादाची कास धरून मांडलेली नसून ईश्वरवादाच्या भूमिकेतून मांडलेली आहे. त्यामुळे समाजाची दृष्टी प्रथम एका अतींद्रिय ईश्वरशक्तीकडे वळवून नंतर ती दृष्टी ईश्वरीशक्तीसह भौतिक, वैज्ञानिक, आर्थिक, अशा विकासाकडे आणली आहे. समाज जेव्हा प्रथम भोगापेक्षा, भोगनिर्मात्या ईश्वराकडे, अपवित्र कर्मापेक्षा पवित्र अशा वैदिक कर्माकडे, स्वार्थाकरिता प्रेम करणाऱ्या इष्ट-मित्र-स्त्री-पुत्रांपेक्षा नि:स्वार्थ अशा संतांकडे वळतो, तेव्हा मग तो भौतिक विश्वात वागत असला तरी, सर्पाच्या डोक्यावरील मणी सर्पाच्या संगतीने जसा विषारी होत नाही, किंवा सरोवरातील कमल पाण्यापासून जसे अलिप्त असते, त्याप्रमाणे तो अन्यायापासून -पापापासून अलिप्त राहतो. तो प्रत्येक व्यवहारात न्याय, अन्याय, पाप, पुण्य यांचा विचार करू लागतो व त्याला लाचलुचपत, काळाबाजार, भेसळ करणे, हिंसा, व्यभिचार, चोरी, मद्यपान व अन्यायी कायदे करणे हे सर्व पापमय वाटतात. अशी समाजाची वैचारिक भूमिका उन्नत होते. म्हणून वैयक्तिक प्रपंच असो वा राज्य असो; धर्म, ईश्वर, संत, ग्रंथ यांना जाणून हे सर्व केले तर कार्य करणारा, त्याचे कार्य व कार्याचे फल हे तीन चिरस्थायी, मंगलप्रद, पवित्र आणि सुखकारक होतात.

याकरिताच श्रीनामदेव महाराज म्हणतात –

ऐसें जाणुनि खेळ खेळें रे।

नसता डावात सापडून याच देहात किंवा भावी देहात दु:ख भोगण्याचा प्रसंग येईल. हा अनर्थ टाळण्याकरिता ज्ञानदेवांचे हे 'पसायदान' आहे.

या पसायदानाप्रमाणे विश्वातील मानवांनी वेदाला प्रमाण मानून स्वधर्मनिष्ठ व

Scanned by CamScanner

ईश्वरनिष्ठ होणे योग्य आहे. पण तसे आजच्या विज्ञान युगात शक्य मात्र नाही. कारण, विश्वातील मानवात तशी श्रद्धा नाही. पण वेद हे भारतीय लोकांचे राष्ट्रीय धन आहे व ते परमश्रद्धेय आहे. स्वधर्माचरण हे परंपरेने चालत आलेला भारतीयांचा वारसा आहे. संत हे भारतातच जन्माला आलेले आप्त आहेत. या गोष्टींचा विचार करून निदान भारतीयांनी तरी स्वधर्माचरण करावे. त्यायोगाने भारतरूपी पूर्वदिशेला जरी स्वधर्मसूर्याचा उदय झाला तरीसुद्धा, त्याचा प्रभावी प्रकाश, दशदिशेला असलेल्या इतर राष्ट्रात पडेल व अखिल विश्वात मंगल सुप्रभात होईल.

आता येथे अशी शंका येणे स्वाभाविक आहे की, आज भारतातदेखील धर्मनिरपेक्ष राज्य आहे आणि समाजाच्या भावनाही धर्माविरुद्धच आहेत. अशा स्थितीत भारतात तरी स्वधर्मसूर्याचा उदय होईल कसा ? भारतीय लोकांनी देखील स्वधर्माचरण नाही केले तर श्रीगुरू निवृत्तिनाथांनी श्रीज्ञानदेवांना –

'हा होईल दानपसावो'

असा जो वर दिला तो निष्फळच होईल आणि त्या वरदानाने ज्ञानदेवांचे सुखी होणे हे देखील भाबडेपणाचेच ठरेल ! अशा दोन भयशंका निर्माण होत असल्या तरी या शंकांना छेद देण्याचे सामर्थ्य श्रीज्ञानदेवांनी श्रीगुरूंना दिलेल्या 'विश्वेशरावो' या विशेषणातच आहे. 'विश्वात्मकदेव' या विशेषणात दान देण्याचा अधिकार जसा सूचित केला आहे तसा 'विश्वेशराव' या विशेषणात आपला वर सफल करण्याचे सामर्थ्य सूचित केले आहे. श्रीनिवृत्तिनाथ हे 'विश्वेशराव' आहेत. अर्थात ते विश्वाचे नियामक ईश्वर आहेत. भगवान सदाशिवाचा अवतार आहेत. त्यामुळे ते आपला वर सफल करण्याकरिता व ज्ञानदेवांना सुखी करण्याकरिता प्रसंगी आपली शांत संतशक्ती बाजूस ठेवून उग्र अशी ईश्वरशक्ती प्रगट करून धर्मसंस्थापना करतीलच. कारण, गीतेत तसे अभिवचन आहे –

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥७॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥ (अ. ४।८)

या प्रसंगी व परमश्रद्धेय वचनानुसार श्रीगुरू विश्वेशराव निवृत्तीनाथ पुन्हा अवतार घेऊन आपला वर सफल करतील. त्यामुळे आज जरी सर्वत्र दुरितांचा अंधार दिसत

Scanned by CamScanner

असला तरी ईश्वरेच्छेने योग्य काल येताच स्वधर्मसूर्याचा उदय होऊन मंगल सुप्रभात होईल हे निश्चित.

सर्वच संत धर्मरक्षणाकरिता सदैव प्रयत्नशील असतात. प्रत्येक संताच्या अंत:करणात धर्मरक्षणाची तळमळ दिसून येते.

श्रीज्ञानेश्वरमहाराज – '**विश्व स्वधर्मसूर्ये पाहो**' असे दीन होऊन स्वधर्माचे दान मागतात.

श्रीनिवृत्तीनाथ – '**हा होईल दानपसावो**' असा तितक्याच औदार्याने त्या मागणीला प्रतिसाद देतात.

श्रीएकनाथ महाराज – '**जैं धर्माची वाट मोडे। अधर्माची सीग चढे। तैं आम्हां येणें घडे। संसारस्थिती**'॥ अशी धर्मरक्षणाची तत्परता दाखवितात.

श्रीतुकाराम महाराज – '**धर्म रक्षावया साठीं। करणें आटी आम्हासी।** असा स्वत:चा धर्मरक्षणासाठी आटोकाट प्रयत्न व्यक्त करतात.

श्रीभगवान – '**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।**' असे म्हणतात.

ही संतांची व देवाची तळमळ बघितली, म्हणजे मग असा प्रश्न निर्माण होतो की, धर्मात असे विशेष आहे तरी काय की, ज्याच्या रक्षणाकरिता संतांनी व देवांनी प्रयत्नशील राहावे ? कदाचित पूर्वीच्या काळात काही वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, अडचण दूर होण्याकरिता किंवा पापाची काल्पनिक भीती निर्माण होण्याकरिता धर्माचा बागुलबुवा निर्माण करण्यात आला असला तरी, हल्लीच्या बुद्धिनिष्ठ विज्ञानयुगात त्या धर्माचा उपयोग काय ?

या प्रश्नांची उत्तरे धर्माची व्याख्या जर बघितली तर सहज कळण्यासारखी आहेत.

'**धारणात् धर्ममित्याहु:**' व्यक्ती, समाज आणि राजशासन यांची स्थिर स्वरूपाची शांततामय नैतिक धारणा ज्याच्यामुळे होते त्याला 'धर्म' म्हणतात. असे महाभारतात म्हटले आहे.

समाजात नैतिक धारणा नको आहे, असे कोणीही शहाणा विज्ञानयुगातही म्हणणार नाही. पण ही धारणा कायद्यासारख्या एरंडाच्या लाकडाचा धीरा देऊन उभी राहणार

Scanned by CamScanner

नाही. त्याकरिता धर्मासारखा पोलादी खांबच लागतो.

समाजात जशी स्थिर स्वरूपाची नैतिक धारणा असावी, तशी माणसांच्या आशा, आकांक्षा, इच्छा पूर्ण होणेही आवश्यक आहे, कारण –

संतावाचून सामान्य मनुष्य निरिच्छ व निर्वासन राहू शकत नाही. मनुष्याला काही विषयांची गरज वाटते व ती गरज भागविण्याचे साधन निरुपद्रवी असावे, आणि मिळविलेले विषय कोणाच्याही हिताच्या आड न येता व कुटुंब, समाज किंवा राजशासन यांच्यापासून भय व उपद्रव न होता भोगता यावेत अशीही इच्छा असते व ती इच्छा पूर्ण करण्याची शक्ती धर्मात आहे. त्यादृष्टीने श्रीमदाद्य शंकराचार्यांनी आणखी एक धर्माची व्याख्या केली आहे ती अशी –

प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुः स धर्मः भोगेच्छु लोकांना ऐहिक व पारलौकिक भोग आणि मोक्षेच्छु लोकांना नित्य निरातिशय आनंदस्वरुप मोक्ष ज्या योगाने प्राप्त होतात तो धर्म होय. ही व्याख्या अतिसुंदर तर आहेच, शिवाय धर्माची उपयुक्तता दर्शवीत आहे.

सारांश, वरील दोन्ही व्याख्येवरून असे सिद्ध होते की, धर्म जर नसेल तर व्यक्ती, समाज, राजशासन यांच्यात शांततामय स्थिर स्वरूपाची धारणा होणार नाही. उलट सर्वत्र स्वैराचाराचे वातावरण निर्माण होते. तसेच धर्म नसेल तर अन्य कोणत्याही निरुपद्रवी साधनाने भोग आणि मोक्ष मिळविणे आणि मिळविलेले निरुपद्रवीपणाने भोगणे शक्य होणार नाहीत.

आता नैतिक धारणा जी बिघडते, व मनुष्याला भोग-मोक्ष प्राप्त होणे व ते सुखसमाधानाने भोगणे अशक्य जे होते, त्याची मूलभूत कारणे तीन आहेत. ती म्हणजे काम, क्रोध आणि लोभ हे तीन दोष मानवी हिताचे वैरी आहेत. या तीन मुख्य दोषांनाच दंभ, दर्प, अभिमान, पारुष्य इत्यादी अवांतर दोषही सहकार्य देत असतात. या कामादि तीन वैऱ्यांचा प्रतिकार करण्यास कायदा हे असमर्थ साधन असून यांचा प्रतिकार करण्यास एक धर्मच समर्थ, प्रभावी व बलदंड साधन आहे.

धर्म हा तीन वैऱ्यांचा चार प्रकारांनी प्रतिकार करीत असतो तो असा –

(१) नियंत्रण (२) निरोध (३) विनियोग (४) आणि नाश अशी धर्माची चार प्रकारची प्रतिक्रिया आहे.

Scanned by CamScanner

काम, क्रोध आणि लोभ हे तीन अंत:करणातील विकार आहेत. पण हे विकार मानवी जीवनाशी बाहेरून मित्रत्वाचे कपटी नाते ठेवून आतून मात्र न कळत शत्रुत्व करून मानवात देव होण्याची शक्यता असूनही मानवाचा दानव बनवतात व मानवी जीवनातले सौंदर्य, मांगल्य, पावित्र्य व सत्यत्व उध्वस्त करून टाकतात.

कारण, काम, क्रोध आणि लोभ या तीन विकारांचे तीन विषय आहेत. (१) कामाचा विषय स्त्री आहे (२) क्रोधाचा विषय प्रतिपक्षी आहे. (३) आणि लोभाचा विषय धन आहे. आता येथे विचार करणे आवश्यक आहे की, हे तीन विकार आणि हे तीन विषय यांच्यावर धर्माचे नियंत्रण नसेल तर विकार अमर्याद वाढतील व विषयांचा अतिसंग्रह होईल. त्यामुळे नैतिक धारणा कोलमडून पडेल. उदाहरणार्थ –

(१) काम आणि स्त्री या दोघांत धर्माने मध्यस्थी नाही केली तर, काम जसा जसा धर्ममर्यादा ओलांडून वाढत राहील, तसा तसा स्त्रीसंग्रह वाढत राहतो. अतिकामी मनुष्य धर्मपत्नीला बाजूस सारून वेश्यागमन करील व पाप आणि रोग यांचे भक्ष्य बनेल. कदाचित् परस्त्रीशी जारकर्म करील व त्या स्त्रीच्या पतीकडून जीवानिशी मारला जाईल. कदाचित् एखाद्या तरुणीवर वा कुमारिकेवर तिची इच्छा नसताना राक्षसी बलात्कार करील व शेवटी पोलिस, कोर्ट, कारागृह यांचा तो बळी होईल.

(२) तसेच क्रोध आणि प्रतिपक्षी या दोघांत जर धर्म आडवा आला नाही, तर अतिक्रोधी मनुष्य स्वत:च्या मनाविरुद्ध वागणाऱ्या माता, पिता, स्त्री, पुत्र यांचा देखील शत्रुबुद्धीने खून करील. मग इतरांचा तर करीलच करील.

समाज जेव्हा क्रोधाने खवळतो तेव्हा समाजाच्या दोन गटात तेढ निर्माण होते व परस्परात मारामारी होते. खून पडतात. राजकीय पक्षात सत्तारूढ पक्षाविषयी जेव्हा क्रोध निर्माण होतो तेव्हा शाब्दिक टीकास्त्र, द्वेष, मत्सर, अपप्रचार, सरकारविरोधी मोर्चे, निदर्शने, घेराव, असे प्रक्षोभक प्रकार देशात सुरू होतात. मग सरकारलाही पोलिसांकडून गोळीबार करावा लागतो व त्यांच्याकरिता जेलची दारे उघडावी लागतात. राज्यकर्त्यांत देखील सत्तालोभाच्या पोटी प्रजेविषयी निष्कारण द्वेष निर्माण झाला तर कायदेगिरी वाढते व प्रतिपक्षाला चिरडून टाकण्याचे कायदेशीर प्रयत्न चालू राहतात. कोणतेही राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राशी शत्रुत्व करीत असेल तर त्या राष्ट्रातील नेत्यांच्या अतिक्रोधाने दोन राष्ट्रांत युद्धाचा भडका उडतो व त्या युद्धात अण्वस्त्रांचे हल्ले सुरू होतात. त्यामुळे निरपराध जीव मरतात; हा एक सार्वदेशिक सिद्धांत

Scanned by CamScanner

आहे.

(३) तसेच लोभ हा विकार आणि धन-पैसा या दोघांमध्ये धर्माचे आसन नसेल तर अतिलोभी मनुष्य धनावर तुटून पडतो व कायद्याची बंधने तोडून किंवा हुशारीने कायद्यातून पळवाटा काढून व्यापारात, उद्योगधंद्यात, नोकरीत लबाडी, काळाबाजार, भेसळ, लाचलुचपत, शेवटी अतिलोभ वाढला तर चोऱ्या, लुटारूपणा दरोडेखोरी हेही प्रकार वाढतात. अशा रीतीने आर्थिक धारणा कोलमडून पडते आणि धर्म-नीतीने वागणारी गरीब माणसे मात्र या स्वार्थी लोभाने चिरडली जातात.

म्हणून सर्व थरांतील अनीतीची बीजे काम, क्रोध आणि लोभ या तीन विकारातच आहेत. म्हणून हे तीन विकार मर्यादित राहतील व विषयांचा अतिसंग्रह एकाकडूनच होणार नाही; व तो अन्यायाने होणार नाही. मिळालेले विषय सुखसमाधानाने प्रत्येकाला भोगता येतील व याकरिता उपाय म्हणजे 'धर्म' होय. उदाहरणार्थ–

(१) काम आणि स्त्री यांच्यात धर्म हा मध्यस्थ असेल तर तो धर्मनियंत्रित काम धर्मपत्नीशी संबंध ठेवतो व त्या धर्माविरुद्ध कामापासून उत्पन्न झालेली प्रजादेखील श्रीशंकराचार्य-ज्ञानेश्वरांसारखी अत्यंत विद्वान, संत, श्रीनामदेव-तुकारामासारखे भक्त, श्री शिवाजीमहाराजांसारखी न्यायवीर जन्माला येते.

(२) क्रोध आणि प्रतिपक्षी यांच्यात धर्माची मर्यादा असेल तर ती हिंसा न होता शासन होत असते. प्रेमळ आईने उनाड मुलाला चांगले वळण लावण्याकरिता रागावून मारले, तरी ती हिंसा नसून शासन आहे. पित्याने स्वतःच्या मुलाला दुर्व्यसनापासून मुक्त करण्याकरिता व त्याला अभ्यासात प्रवृत्त करण्याकरिता मारले तरी ते शासन होते. शाळेतील गुरुजींनी दुर्वर्तनी व अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या हिताकरिता रागावून मारले तरी ते सुशासन आहे. राज्यकर्त्यांनी खुनी, चोर, जार, अन्यायाने व्यापार व उद्योगधंदा, नोकरी करणाऱ्यास दंड, शिक्षा केल्यास तेही सुशासनच आहे. धर्म-नीती, जाणणाऱ्या वेद-शास्त्रवेत्त्या रागद्वेषरहित आचार्यांनी अन्यायी, अधार्मिक राजाला कडक शब्दांत उपदेश केल्यास तेही सुशासनच होते. ही सर्व शासने योग्य व समर्थनीय ठरतात व धर्म-नीतिशास्त्रात अशी शासने आवश्यकही आहेत.

(३) तसेच लोभी आणि धन या दोघांत धर्म जेव्हा मित्रत्वाने मध्यस्थी करतो, तेव्हा तो लोभी मनुष्य धर्मरूपी मित्राच्या सल्ल्याने पाप-पुण्य, नीति-अनीति,

Scanned by CamScanner

कायदा-बेकायदा यांचा विचार करून पैसा मिळवितो व गरजेपेक्षा अधिक पैसा मिळाल्यास स्वकल्याणार्थ तीर्थयात्रा, दानधर्म, यज्ञ-याग, लोकोपयोगी कार्ये याकडे त्याचा विनियोग करतो व त्या योगाने सहजच समाजात आर्थिक वितरण होते.

शास्त्रात सांगितलेले गर्भाधानादि षोडश संस्कार आणि नित्य-नैमित्तिक आणि प्रायश्चित्त कर्मे यांच्या आचरणाने आणि सत्संगती, सदुपदेश, सच्छास्त्राचा अभ्यास व विचार या योगाने कामादी विकारावर नियंत्रण ठेवता येते. हा झाला नियंत्रणाचा प्रकार. आता निरोधाचा प्रकार असा आहे की,

यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या अष्टांग योगरूप धर्माच्या योगाने मुळात चित्ताचाच निरोध झाल्यामुळे चित्त हे निर्विकल्प होते. त्यामुळे सहजच कामादी विकारांचाही निरोध होतो. आता हा निरोध करणे झेपत नसेल तर विनियोगाचाही एक प्रकार आहे तो असा –

भक्तिरूप धर्म ज्याला 'भागवत धर्म' म्हणतात, या धर्माच्या योगाने, कामादिकांचा आदिपुरुष भगवंताकडे विनियोग करता येतो. गोपींचा काम, शिशुपालाचा क्रोध, आणि प्रल्हाद, नारद, शुक यांचा लोभ भगवंताविषयी होता. त्यामुळे भगवंतांनी त्यांचा उद्धार केला. हा झाला विनियोगाचा प्रकार. आता नाशाचा प्रकार असा की,

निवृत्तिलक्षण धर्माने गुरुकृपेने ब्रह्मसाक्षात्कार झाला तर तो साक्षात्कारी पुरुष स्थितप्रज्ञ, गुणातीत, अमानी, अदंभी, अहिंसक असा होतो व ब्रह्मसाक्षात्काराने कामादिकांचे मूळ उपादानकारण असलेले अज्ञानच नष्ट होत असल्यामुळे कामादिकांचाही आपोआप नाश होतो व विषयांचे ठिकाणी मिथ्यात्वाचा निश्चय होतो. अर्थात काम नष्ट झाल्यामुळे स्वस्त्रीदेखील भोग्य वाटत नाही आणि परस्त्रीचे ठिकाणी मातृभावच काय पण ब्रह्मभाव निर्माण होतो. तसेच क्रोध नष्ट झाल्यामुळे शत्रू आणि मित्र यांच्यात समभाव निर्माण होतो आणि लोभ हा नष्ट झाल्यामुळे धन आणि मृत्तिका समान वाटतात.

याप्रमाणे धर्म हा कामादी वैऱ्यांचा प्रतिकार चार प्रकारांनी करतो. या चारांपैकी नियंत्रणापेक्षा निरोध श्रेष्ठ, निरोधापेक्षा विनियोग श्रेष्ठ, विनियोगापेक्षा नाश श्रेष्ठ आहे हे चार प्रकार, क्रमाने षोडश संस्कारासह नित्यनैमित्तिक कर्म, योग, भक्ती व ज्ञान या धर्मांनी साध्य होतात.

Scanned by CamScanner

म्हणून काम, क्रोध आणि लोभ या दुर्विकारांपासून रक्षण करण्याकरिता व्यक्ती, समाज व राजशासन, नीतिशुद्ध राहण्याकरिता व प्रत्येकाला अभ्युदय व निश्रेयस यांची प्राप्ती होण्याकरिता 'धर्म' आहे.

म्हणूनच विश्वकल्याणाची इच्छा करणाऱ्या प्रत्येक संतांनी धर्मरक्षणाची तत्परता जोपासली आहे.

याच विशाल दृष्टिकोनातून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्वधर्माला प्राधान्य ज्यांच्यात आहे, असे हे पसायदान मागितले आहे.

श्री निवृत्तिनाथांनी त्या दानाची उपयुक्तता जाणून 'तथास्तु' म्हणून वर दिला आहे.

Scanned by CamScanner

आज धर्म ही संकल्पना जीवनातून हद्दपार झाली आहे. ईश्वरनिष्ठा हा शब्द कालबाह्य बनला आहे. संत, सत्कर्म, भजन इ. गोष्टी अडगळीच्या बनल्या आहेत. पाप-पुण्य, नीति-अनीती यांना धूसर स्वरूप प्राप्त झाले आहे. ' धर्मनिरपेक्षते 'च्या नावाखाली आपण दुरितांच्या तिमिरात केव्हा बुडून गेलो हे कळलेच नाही. अशा वेळी ज्ञानदेवांचे ' पसायदान ' आम्हाला नवा प्रकाश देत असते.

' पसायदान ' आकाराने अगदीच लहान. अवघे नऊ ओव्यांचे. पण त्यात ज्ञानदेवांनी ' विश्वाचे आर्त ' प्रगट केले आहे.

' पसायदाना 'च्या प्रत्येक ओवीत या विश्वाचे महन्मंगल चिंतिले आहे. एका पवित्र वाग्यज्ञाच्या शेवटी एका महामानवाने चिंतिलेल्या विश्वकल्याणाच्या प्रार्थनेला नक्कीच फार मोठा अर्थ आहे. हा अर्थ पू. शंकरमहाराजांनी आपल्या चिंतनशील वृत्तीतून येथे व्यक्त केला आहे.

' पसायदान ' हे जीवनाच्या सर्व अंगांना समृद्ध व संपन्न करणारे ' पीयूष ' आहे हे महाराजांनी येथे कुशलतेने दाखवून दिले आहे.

Scanned by CamScanner